सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण




# महा आवास

त्रैमासिक

ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२



अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.एकनाथ शिंदे यांचे स्वागत करतांना मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन



अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांचे स्वागत करतांना मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन



अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी मा.विधानसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य ॲड.राहुल नार्वेकर यांचे स्वागत करतांना मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन



अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांचे स्वागत करतांना मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

## महा आवास



| | |
|---|---|
| मार्गदर्शक | राजेश कुमार, भा.प्र.से.<br>अतिरिक्त मुख्य सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे,<br>संचालक,<br>राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण |
| प्रबंध संपादक | मंजिरी टकले, उपसंचालक<br>नीलेश काळे, उपसंचालक<br>वैभव ठाकुर, प्र. सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे, प्रशिक्षण समन्वयक |
| सहाय्यक संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार<br>माधुरी चौधरी |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे<br>प्रशिक्षण समन्वयक<br>(माहिती, शिक्षण व संवाद) |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.com |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |

वर्ष ३ रे। अंक १० वा। ऑक्टोबर ते डिसेंबर २०२२


## अनुक्रमणिका



| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संपादकीय | १ |
| २ | विशेष - अमृत महा आवास अभियान २०२२-२३ | ३ |
| ३ | अमृत महा आवास अभियान २०२२-२३ बाबत मान्यवरांचे संदेश | ७ |
| ४ | विविध उपक्रमांचा मागोवा<br>क्षमता बांधणी उपक्रम | ९ |
| | संनियंत्रण व मूल्यमापन उपक्रम | १२ |
| | माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम | १८ |
| | समन्वय उपक्रम | २० |
| | केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपुट | २२ |
| ५ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा संचित प्रगती अहवाल प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण | २३ |
| | रमाई आवास योजना | २४ |
| | शबरी आवास योजना | २५ |
| | पारधी आवास योजना | २६ |
| | आदिम आवास योजना | २७ |
| | यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना | २७ |
| ६ | ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील नाविन्यपूर्ण उपक्रम/ यशोगाथा | २८ |
| ७ | फोटो गॅलरी - राज्यस्तरीय महा आवास अभियान २०२०-२१ पुरस्कार वितरण | ३४ |
| ८ | मिडिया कवरेज | ३५ |



महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९



डॉ. राजाराम दिघे
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण

डॉ. राजाराम दिघे
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष -
ग्रामीण गृहनिर्माण

### भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त

# अमृत महा आवास अभियान २०२२ - २३

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात दिनांक **२० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** राबविण्यास मान्यता देण्यात असून "सर्वांसाठी घरे- २०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे हा या अभियानाचा हेतू आहे.

## अभियान राबविण्याचे उद्देश्ये

I. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.

ii. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणा व पंचायतराज संस्था यांचेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- स्वयंसेवी संस्था (लायन्स क्लब, रोटरी क्लब, इ.), सहकारी संस्था (साखर कारखाने, दुधसंघ, इ.), खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था (IITB, COEP, VNIT, इ.), बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. भागधारकांचा सक्रीय सहभाग वाढविणे.

iii. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमताबांधणी व जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.

iv. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.

v. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांचा दर्जा व गुणवत्ता वाढविणे.

## अभियान कालावधीत राबवावयाचे उपक्रम

**i. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे:-** ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना**, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग – उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबविणे. तसेच जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी राज्यात **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये** प्रत्येकी किमान एक याप्रमाणे **बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट** उभारणे.

त्याचप्रमाणे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची 'लॅण्ड बँक' तयार करणे.**

**ii. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे १०० टक्के मंजूरी देणे:-** केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरीत करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांना १०० टक्के मंजूरी देणे आणि लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** त्वरीत वितरीत करणे, घरकुलाचे काम तात्काळ सुरु करणेबाबत सूचना देणे, घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे व भूमिपूजन कार्यक्रम करुन **घरकुलाचे बांधकाम सुरु करणे.**






**iii. मंजूर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे:-** केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर घरकुलांना **पहिल्या हप्त्याचे वितरण कमीत कमी वेळेत करणे**. पुढील हप्ते घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरीत करणे. हे करतांना लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजन** करणे. तसेच गरजेप्रमाणे इच्छुक लाभार्थ्यांना वित्तीय संस्थांकडून **गृहकर्ज मिळवून देण्यासाठी मदत** करणे.

**iv. सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे:-** केंद्र पुरस्कृत व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत सर्व मंजूर घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे. यामध्ये लाभार्थ्यांच्या सक्रीय सहभागासाठी त्यांच्या बैठका/मेळावे घेणे, सरपंच, ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी देणे व मंजूर केलेली सर्व घरकुले किमान कालावधीत पूर्ण करणे. यासाठी राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/प्रभाग संघ/ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक घरकुल मार्ट सुरु करुन** त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध करणे. तसेच सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे **'सॅण्ड बँक' ची निर्मिती करणे.**

**v. प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे :-** प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करणे. यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण करुन त्यावर उपाययोजना करून सदर घरकुले पूर्ण करणे**, याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने **'लोक अदालत'** वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करणे. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले



प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand करणे व **यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नविन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेणे.**

**vi. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे:-** घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून पूर्ण करुन **त्यांचे मुल्यांकन(Assessment) त्वरीत पूर्ण करुन घेणे** व सदर माहिती आवास सॉफ्टवर अद्ययावत होईल याची खात्री करणे. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय यादी तयार करुन त्यांचे पॅनेल बनविणे व या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेणे.**

**vii. इंदिरा आवास योजनेंतर्गत उर्वरीत सर्व घरकुले पूर्ण करणे व क्षेत्र अधिकारी ॲप वापरणे :-** इंदिरा आवास योजनेंतर्गत सन २०१४-१५ व त्यापूर्वी भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या घरकुल **लाभार्थ्यांना सिंगल पेज एन्ट्रीनुसार तात्काळ निधी वितरीत करून घरकुले आर्थिकदृष्ट्या पूर्ण करणे**. तसेच सन २०१५-१६ मध्ये मंजूर घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून **त्यावर उपाययोजना करून प्राधान्याने सदर घरकुले भौतिक व आर्थिक दृष्ट्या 100 टक्के पूर्ण करणे.**

तसेच ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी **प्रधानंत्री आवास योजना- ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी क्षेत्र अधिकारी ॲप (Area Officer Aap) ची निर्मिती केली आहे.** ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पहाणी करतांना या ॲपचा जास्तीत जास्त वापर करणे.

**viii. सामाजिक लेखापरीक्षण वेळेत करणे:-** प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे **सामाजिक लेखापरीक्षण करणे**. सामाजिक लेखापरीक्षण करतेवेळी लेखापरीक्षण मार्गदर्शक तत्वांचा अवलंब करणे. सामाजिक लेखापरीक्षण करताना सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, इतर पदाधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व पालक अधिकारी यांनी ग्रामपंचायतीस सर्वोतोपरी सहकार्य करणे.

**ix. शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे :-** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांशी कृतीसंगम करणे. जसे - ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी **महात्मा गांधी**

**राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**, शौचालयासाठी **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण**, नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी **जल जीवन मिशन**, गॅस जोडणी साठी **प्रधानमंत्री उज्ज्वला योजना**, विद्युत जोडणी साठी **सौभाग्य योजना**, उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन**, उर्जेच्या बचतीसाठी **महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (महाउर्जा)**, इ.

तसेच **दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, गृहसंकुले, अपार्टमेंट यांना **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे**, इ. उपलब्ध करुन देणे.

**x. नावीन्यपूर्ण उपक्रम (Innovations / Best Practices) राबविणे :-** ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी पुढीलप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे.

अ) ग्रामीण गृहनिर्माण लाभार्थ्यांच्या **बहुमजली इमारती, गृहसंकुले व हाऊसिंग अपार्टमेंट** यांच्या **सहकारी संस्था स्थापन करणे**.

ब) **वाळूला पर्याय** म्हणून क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर करणे.

क) किमान १० % घरकुल बांधकामासाठी **स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान**, इ. चा वापर करणे.

ड) किमान १०% घरकुल बांधकामामध्ये **फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग**, इ. चा वापर करणे. रंगरंगोटी करतांना शासनाचे पत्र क्र. जा. क्र. राव्यक-ग्रागृ/बांध/१४०/२०२१, दिनांक १८ मे, २०२१ रोजीच्या पत्रानुसार **घरकुलांना रंगसंगती करणे**.

इ) घरावर ग्रामीण गृहनिर्माण **योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद** इ. बाबींची पूर्तता करणे.

## अभियानाच्या अंमलबजावणीसाठी क्षमता बांधणी कार्यक्रम

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** प्रभावी अंमलबजावणी व भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी राज्यात अभियानाच्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा, विभागस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय कार्यशाळा, तालुकास्तरीय कार्यशाळा व ग्रामस्तरीय कार्यशाळांचे आयोजित करून या कार्यशाळांमध्ये अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे पुढील उपाययोजना करण्यात आल्यात

**ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठनः-** या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात यावे. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश करता येईल. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करावयाचे आहे.

**लाभार्थी मेळावे:-** गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन, प्रोत्साहन देणे, तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करणे, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम करणे, गृहप्रवेश कार्यक्रम करणे, इ. सारखे उपक्रम राबविणेत यावेत.

**८) बँक मेळावेः -** तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात यावेत.

## अभियानाच्या प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम

'अमृत महा आवास अभियान २०२२-२३' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारीक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचीत वापर करण्यात यावा.

## अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर पुढीलप्रमाणे



समित्या कार्यरत राहतील. या अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे संनियंत्रन व मूल्यमापन करतील. तसेच अभियान कालावधी संपल्यावर अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करून अभियानात उत्कृष्ट कमासाठीच्या पुरस्काराची नामांकने निवडतील.

| पुरस्कार नामांकने | उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने निवडण्यासाठी समित्या |
|---|---|
| राज्यस्तरीय पुरस्कारांची निवड | राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| विभागस्तरीय पुरस्कारांची निवड | विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| जिल्हास्तरीय पुरस्कारांची निवड | जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| तालुकास्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |

## अभियान कालावधीतील उत्कृष्ट कार्याचा गौरव

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुढीलप्रमाणे **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** देऊन गौरविण्यात येईल. पुरस्काराचे स्वरुप, पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे वेळापत्रक इत्यादी बाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

## -: राज्यस्तरीय पुरस्कार :-

### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृहसंकुल व सर्वोत्कृष्ट बहुमजली गृहसंकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट विभाग- प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृहसंकुल व सर्वोत्कृष्ट बहुमजली गृहसंकुल (हाऊसिंग अपार्टमेंट) - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## -: विभागस्तरीय पुरस्कार :-

### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### I. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. शासकीय जागा उपलब्धता व वाळू उपलब्धता सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## -: जिल्हास्तरीय पुरस्कार :-

### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## -: तालुकास्तरीय पुरस्कार :-

### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट क्लस्टर – प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट क्लस्टर – प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## -: ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार :-

### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.





## या अभियानात ५ लाख घरे पूर्ण करू



आज अमृत महा आवास अभियानाचा शुभारंभ झाला असे मी जाहिर करतो. अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा असून मानवाला निवारा किती महत्वाचा आहे, याची सर्वांनाच जाणीव आहे. हक्काच स्वतःचं घर असावं हे प्रत्येकाच स्वप्न असतं. सर्वसमान्यांना हक्काच घर मिळावं यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून अनेक उपक्रम व योजना राबविण्यात येत आहेत. आदरणी प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांचे सर्वांसाठी घरे - २०२४ हे स्वप्न असून त्यांचा हा संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्यावर वेळेत घरे पूर्ण करण्याची जबाबदारी आहे. घरकुलाचे बांधकाम १०० दिवसात जर पूर्ण झाले तर निश्चितच या अभियानात आपण ५ लाख घरे पूर्ण करू व आदरणीय प्रधानमंत्री श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते या घरकुलांचे लोकापर्ण करू शकतो.

ग्राम विकास विभागामार्फत जनतेच्या हितासाठी अनेक उपक्रम राबविण्यात असून योजनांच्या कामात गती वाढली आहे. सर्वांना दर्जेदार हक्काचे घरे वेळेत मिळावे यासाठी आपण प्रयत्नशिल आहोत. प्रत्येकाला हक्काचा निवारा मिळावा यासाठी घरकुल यादीमध्ये ज्यांचा समावेश नाही अशा सर्वसामान्य लोकांना घरे देण्याचा निर्णय आम्ही घेतला असून त्यादृष्टीने वाटचाल सूरू आहे. बेघरमुक्त महाराष्ट्र करून घरापासून कोणीही वंचित नसणारे देशातले पहिले राज्य महाराष्ट्र असेल याची मला खात्री आहे. याकरीता लोकप्रतिनिधी व प्रशासन यांनी एकत्र काम करणे आवश्यक असून यामध्ये सर्व शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचे योगदान महत्वाचे असेल.

**- मा. ना.श्री. एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

## या अभियानातून बेघरमुक्त महाराष्ट्र



प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही योजना देशाचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी सूरू केली. सन २०११ मध्ये SECC च्या सर्वेक्षणात जेवढे बेघर होते त्यांना सन २०२२ पर्यंत घरे देण्याचे उद्दिष्ट निश्चित केले. महाराष्ट्राला १० ते १०.५० लाखाचे उद्दिष्ट मिळाले असून यामध्ये भूमिहीन व अतिक्रमित लाभार्थांचा मोठा प्रश्न असून यावर लवकरच मार्ग काढून या अभियानात ५ लाख घरे पूर्ण करून या लाभार्थांचा गृहप्रवेश मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या शुभहस्ते करू, असा मला विश्वास आहे.

लाभार्थ्यांना पहिला हप्ता निट दिल्यामुळे लोकांना थोडी मदत होते व लोक प्रेरीत होवून Auto pilot mode वर कामे पूर्ण होतात. ५ ब्रास वाळू उपलब्धतेसाठी सर्व महसूली यंत्रणेने पुढाकार घ्यावा. घरकुल मार्टच्या माध्यमातून घरकुल बांधकाम साहित्य पोहोचविणेसाठी प्रयत्न केला पाहिजे. मला आनंद आहे की, गवंडी प्रशिक्षण व घरकुल मार्ट Permanent futures असून रोजगार निमिती झाली आहे.

आवास प्लस मध्ये समाविष्ट नाही असं एक मोठ टार्गेट बाकी असून याकरीता आवश्यकता पडली तर राज्याची अजून एक योजना सूरू करू. जेणे करून खऱ्या अर्थाने अमृत महोत्सवी वर्षात अमृत आवास अभियानातून बेघरमुक्त महाराष्ट करता येईल. याकरीता ग्रामविकास विभाग पुढाकार घेईल असा मला विश्वास आहे. एखाद्या व्यक्तिला घर देणे यापेक्षा दुसरी आनंदाची गोष्ट नाही. गरिबाला घराची मोठी किंमत असून गृहप्रवेश करतांना मिळालेला आनंद आपल्या पुरस्कारापेक्षाही मोठा आहे.

**- मा. ना.श्री. देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य**

## अमृत महा आवास अभियानाचा लाभ तळागळातील नागरीकांना होणार



आपल्या देशाने सन्माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली जगातील ५ व्या क्रमांकाची अर्थव्यस्था Establish करण्याचा विक्रम केला आहे. देश यशस्वी वाटचाल करत असल्याने देशवासीयांच्या व महाराष्ट्रातील बांधवांच्या निश्चितपणे अपेक्षा वाढल्या आहेत. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार कटिबद्ध असल्यामुळे सामान्य जनतेच्या विकासासाठी आवास योजना, मनरेगा, ग्रामीण जीवनोन्नती अभियान अशा अनेक योजना राबवित आहे. अमृत महा आवास अभियान हे ग्रामीण भागातील नागरीकांसाठी अत्यंत महत्वाचे असून या अभियानाचा लाभ तळागळातील अंतिम टप्प्याच्या नागरीकांना होणार, याची मला खात्री आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी मी सर्वांना शुभेच्छा देतो. तसेच २०२० सालच्या महा आवास अभियानासाठी जे पुरस्कार विजेते आहेत त्या सर्वांना शुभेच्छा देतो.

खरतर अध्यक्ष यांना चांगल्या कार्यक्रमांचे श्रेय घेता येत नाही, परंतु हा कार्यक्रम माझ्या विधानसभेतून सुरू होत असल्याने या कार्यक्रमाचे थोडेफार श्रेय मी घेणार आहे.

**- मा. ॲड. राहुल नार्वेकर, अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा**

## देशात घरकुल बांधकामात महाराष्ट्र अग्रस्थानी होणार




राज्याच्या लोकसंख्येचा मोठा भाग ग्रामीण भागात असून ग्रामीण भागातील प्रत्येक माणसाला पाणी, लाईट, गॅस व घर मिळाले पाहिजे या उद्देशाने देशाचे मा. पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी या सर्व गोष्टींना अग्रक्रम दिला आहे. अमृत महा आवास अभियानात १०० दिवसात ५ लाख घरे पूर्ण करण्याचा आमचा संकल्प असून आपल्या यंत्रणेने ठरवलं तर ९० दिवसात हे काम करू शकतील असा मला पूर्ण विश्वास आहे. उत्तर प्रदेशमध्ये ११० दिवसात घर बांधकाम होत असून आम्ही १०० दिवसात घर बांधकाम करून त्यांचा रेकार्ड मोडून महाराष्ट्र हे देशातलं अग्रस्थानी राज्य असल्याचे मला सिध्द करायचे आहे. घरकुल बांधकाम करतांना गतीमानते सोबतच गुणवत्ता राखत दर्जेदार घरकुलांची निर्मिती करणे आवश्यक आहे. याकरीता आपल्या यंत्रणेने सातत्याने पाठपुरावा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी व जनजागृती करणे आवश्यक असून याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रकल्प संचालक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वेळ देणे व ग्रामपंचायतीच्या सरपंच ते ग्रामसेवकापर्यंत आढावा घ्यावा.

प्रकल्प संचालक यांचे बळकटीकरण करण्यासाठी त्यांचे अधिकार आम्ही वाढवून देतो आहे. तरी आज आपण सर्वांनी हे अभियान कुठल्याही परिस्थितीमध्ये पूर्णत्वास नेण्याचा संकल्प करूया!

**- मा. ना.श्री. गिरीष महाजन, मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज**

## ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात महाराष्ट्राचे स्थान देशात उंचावले




केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी तसेच आपण कॅबिनेटमध्ये आम्हाला दिलेल्या निर्देशाप्रमाणे या कार्यक्रमात आपल्या राज्याचा देशात प्रथम क्रमांक कसा राहील, आवास योजनांमध्ये उत्कृष्ट कामगिरी कशी करता येईल यासाठी २० नोव्हेंबर २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून या अभियानाची सुरुवात करत आहोत.

राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण मार्फत घरकुलाचे कामकाज सुरू असून आतापर्यंत अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले आहेत. यासाठी फिल्ड ऑफिसर विशेषतः मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बहुमजली इमारती, गृह संकुले, सॅण्ड बँक, लँण्ड बँक, घरकुलासाठी जागा देण्याचे कार्यक्रम या सर्वांमध्ये उत्कृष्ट काम केले आहे. यामुळे महाराष्ट्राचे स्थान देशात उंचावले आहे.

मा. प्रधानमंत्री साहेबांचे सर्वांसाठी घरे २०२४ हे स्वप्न असून यामध्ये महाराष्ट्राने चांगली कामगिरी बजावली आहे. गेल्या वेळेस आम्ही अभियान राबवून पाच लाख घरे पूर्ण केली. यासाठी उत्कृष्ट कामगिरी करऱ्यांसाठी बक्षीस वितरण आज होणार आहे. सर्व पुरस्कार विजेत्यांचे मी अभिनंदन करतो. यापुढेही आपण या प्रकारे कामगिरी बजावावी व महाराष्ट्राचे नाव या कार्यक्रमात देशामध्ये नेहमी उच्च स्थानावर ठेवणार, याची मला खात्री आहे.

ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात अनेक उपक्रम राबविले यामध्ये आयआयटी मुंबई यांच्या माध्यमातून ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांना प्रशिक्षण, ग्रामीण गवंडी प्रशिक्षणातून गवंड्याच्या पॅनेलची निर्मिती, सी.एस.आर. व नवीन तंत्रज्ञान वापरून आदर्श व दर्जेदार घरांची निर्मिती, कॉप-शॉप व घरकुल मार्ट मधून रोजगार निर्मिती, आपण याद्वारे संख्यात्मक लक्ष न ठेवता घर बांधताना गुणात्मक याचा काळजी घेतली आहे. लाभार्थ्यांना घरकुलासह Convergence च्या माध्यमातून इतर शासकीय योजनांचा लाभ देण्यासाठी आम्ही बारकाईने लक्ष दिले.

या अभियानात सुद्धा अशाच प्रकारे चांगले काम करू व नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून दर्जेदार घरे आपल्या लाभार्थ्यांना मिळतील अशी मला खात्री आहे. या अभियानात आपण ३१ मार्च २०२२ला पाच लाख घरे पूर्ण करणार असून याकरीता आपल्या सर्वांच्या सक्रीय सहभाग असेल, याचा मला पूर्ण विश्वास आहे. या अभियानात ५ लाख घरे पूर्ण करून या सर्वांचा घरांचा गृहप्रवेश कार्यक्रम या मंच्यावर उपस्थितीत सर्व मान्यवरांच्या हस्ते निश्चित घेऊ. अमृत महा आवास अभियानात नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून गतीमानतेने व गुणवत्तापूर्ण घरांची निर्मिती करून संपर्ण देशात नवीन आदर्श निर्माण करू, असा मला पूर्ण विश्वास आहे. या अभियानाच्या यशस्वीतेसाठी माझ्याकडून सर्व शासकीय यंत्रणेला शुभेच्छा!

**- मा. श्री. राजेश कुमार, अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग**

# अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा

**"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ दिनांक २४ नोव्हेंबर २०२२ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री. एकनाथ शिंदे यांचे शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस, मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, ॲड. राहुल नार्वेकर, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री. गिरीष महाजन, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांचे प्रमुख उपस्थितीत यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला.

या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेला सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, ग्रामविकास विभागातील अधिकारी/कर्मचारी व महा आवास अभियान पुरस्कार २०२०-२१ चे पुरस्कार विजेते, इ. उपस्थित होते.

या कार्यशाळेची सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन व स्वागत समारंभ करण्यात आला. या कार्यशाळेत मा.अतिरिक्त मुख्य सचिव ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी प्रास्ताविक सादर केले. तसेच संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** विषयी सादरीकरण केले.

याप्रसंगी मंचावर उपस्थित सर्व मान्यवरांनी ग्राम विकास विभागाची विकास कामे, ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील कामगिरी व अभियाना विषयी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. तसेच या अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्वांनी सक्रीय सहभाग घेण्याचे आवाहन केले.




# विभागस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील सर्व विभागांमध्ये **दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ ते २७ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत** संबंधित विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी ( जिल्हा परिषद), अतिरिक्त आयुक्त/उपायुक्त ( आदिवासी विकास, सामाजिक न्याय, कामगार) यांचे उपस्थितीत विभागस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ), जिल्हा माहिती अधिकारी, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विभागीय आयुक्त कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विभागस्तरीय कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण उप आयुक्त (विकास) यांनी केले. तसेच या कार्यशाळांना राज्यस्तरावरुन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे अधिकारी निरीक्षक म्हणून उपस्थित होते.



# जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये **दिनांक २८ नोव्हेंबर, २०२२ ते ०४ डिसेंबर, २०२२ या कालावधीत** संबंधित जिल्ह्याचे मा. पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली तसेच मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद यांचे प्रमुख उपस्थितीत आणि मा. खासदार, मा. आमदार,जिल्हाधिकारी,मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ)



यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, उपसभापती, गट विकास अधिकारी, तहसिलदार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, तालुकास्तरीय डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण संबंधित जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयाचे प्रकल्प संचालक यांनी केले. तसेच या कार्यशाळांना विभागस्तरावरील अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

## तालुकास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यातील जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये **दिनांक ०५ डिसेंबर, २०२२ ते ११ डिसेंबर, २०२२** या कालावधीत तालुक्याचे मा. आमदार यांचे अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समिती सभापती, उपसभापती, जिल्हा परीषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी, तहसिलदार यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळांना तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समिती कार्यालयातील संबंधित अधिकारी/ कर्मचारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इत्यादींना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन व अभियानाचे सादरीकरण संबंधित पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांनी केले. तसेच या कार्यशाळांना जिल्हास्तरावरील अधिकारी निरीक्षक म्हणून होते.



## ग्रामस्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळा

राज्यात सर्वत्र **दिनांक १२ डिसेंबर, २०२२ ते १८ डिसेंबर, २०२२ या कालावधीत** गावस्तरावर सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत **ग्रामस्तरीय कार्यशाळा** आयोजित करुन त्यामध्ये ग्रामसेवक, तलाठी यांनी अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेस तालुकास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते.

या कार्यशाळाद्वारे **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** चे यशस्वी अंमलबजावणीसाठी मिळालेली माहिती सर्व लाभार्थी यांना देवून गावातील गतिमान अंमलबजावणीबाबतचे नियोजन करण्यात आले.

या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायती मध्ये '**ग्राम कृती गटाचे गठन**' करण्यात आले. गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत लाभार्थ्यांचे मेळावे, तालुकास्तरावर/ गावोगावी बँक अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी बँक मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे.



## ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी बाहेरील राज्यात अभ्यास दौऱ्यांचे आयोजन

ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात इतरराज्यांमध्ये सुरू असलेल्या नावीन्यपूर्ण उपक्रमांचा अभ्यास करून त्याचा उपयोग आपल्या राज्यातही होणेसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने भागधारकांच्या क्षमता बांधणीसाठी बाहेरील राज्यात अभ्यास दौरे केले.

दिनांक ८ ते ११ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत आसाम राज्याचा दौरा करण्यात आला. या दौऱ्यामध्ये राज्य व्यवस्थापन कक्षाचे राज्य समन्वयक (MIS) श्री. मायकल एल्डन, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. योगेश पाटील, विभागीय आयुक्त कार्यालय पुणेच्या सहाय्यक आयुक्त (विकास) डॉ. सीमा जगताप, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पुणेच्या



प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा साताराच्या प्रकल्प संचालक श्रीमती सुषमा देसाई, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कोल्हापूरचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. ज्ञानदेव मडके, पुणे जिल्ह्यातील पंचायत समिती जुन्नरचे गट विकास अधिकारी श्री. शरदचंद्र माळी, पंचायत समिती वेल्हेचे गट विकास अधिकारी श्री. पंकज शेळके, कोल्हापूर जिल्ह्यातील पंचायत समिती बावडाचे गट विकास अधिकारी श्रीमती माधुरी परीट यांचा समावेश होता.

दिनांक ९ ते ११ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत आसाम राज्याचा दौरा करण्यात आला. या दौऱ्यामध्ये राज्य व्यवस्थापन कक्षाचे लेखा सहाय्यक श्री. दिनेश वाडेकर, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. निलेश गोफणे, नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयाचे विभागीय प्रोग्रामर श्री. शुभम हर्षे, जिल्हा परिषद नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.योगेश कुंभेजकर (भा.प्र.से.), जिल्हा परिषद वर्धाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे (भा.प्र.से.), जिल्हा परिषद चंद्रपुरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विवेक जॉन्सन (भा.प्र.से.), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नागपूरचे प्रकल्प संचालक श्री. विवेक इलमे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वर्धाचे प्रकल्प संचालक श्री. विश्वास सिद, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा चंद्रपुरचे प्रकल्प संचालक श्रीमती वर्षा गौरकर, नागपूर जिल्ह्यातील पंचायत समिती भिवापुरचे गटविकास अधिकारी श्री. मनोज हिरूडकर, वर्धा जिल्ह्यातील पंचायत समिती वर्धाचे गटविकास अधिकारी श्री.शशिकांत शिंदे, चंद्रपुर जिल्ह्यातील पंचायत समिती चंद्रपुरचे गटविकास अधिकारी श्रीमती प्रणाली कोचरे यांचा समावेश होता.



त्याचप्रमाणे दिनांक ९ ते ११ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत बिहार राज्याचा दौरा करण्यात आला. या दौऱ्यामध्ये राज्य व्यवस्थापन कक्षाचे राज्य समन्वयक संनियंत्रण व मूल्यमापन डॉ. संघरत्न सोनवणे, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. संजिव शुक्ला, विभागीय आयुक्त कार्यालय नाशिकचे सहाय्यक आयुक्त (विकास) श्री. मनोजकुमार चौधरी, विभागीय प्रोग्रामर श्री. सिदिकी ओएस, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नाशिकचे प्रकल्प संचालक श्री. आनंद पिंगळे, नाशिक जिल्ह्यातील पंचायत समिती बागलाणचे गट विकास अधिकारी श्री. पांडुरंग कोल्हे, जळगाव जिल्ह्यातील पंचायत समिती पाचोराचे गट विकास अधिकारी श्री. अतुल पाटील, पंचायत समिती पाचोराचे गट विकास अधिकारी श्री. नंदकुमार वाळेकर, पंचायत समिती अमळनेरचे गट विकास अधिकारी श्री. विशाल शिंदे, अहमदनगर जिल्ह्यातील पंचायत समिती अकोलेचे गट विकास अधिकारीश्री. राहुल शेळके यांचा समावेश होता.




दिनांक १५ ते १७ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत छत्तीसगड राज्याचा दौरा करण्यात आला. या दौऱ्यामध्ये राज्य व्यवस्थापन कक्षाचे प्र. सहाय्यक संचालक (लेखा) श्री. वैभव ठाकूर, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. संदेश पाटील, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावतीचे सहाय्यक आयुक्त (विकास) श्री. राजीव फडके, विभागीय प्रोग्रामर श्री.मोहसीन अली, अमरावती जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अविश्यांत पंडा (भा.प्र.से.), अकोला जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सौरभ कटियार (भा.प्र.से.), बुलढाणा जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारीश्रीमती भाग्यश्री विसपुते (भा.प्र.से.), जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बुलढाणाचे प्रकल्प संचालक श्री. राजेश इंगळे, अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती अचलपूरचे गटविकास अधिकारी श्री. सुधीर अरबट, पंचायत समिती अंजनगाव सुर्जीचे गटविकास अधिकारी श्री. विनोद खेडकर, अकोला जिल्ह्यातील पंचायत समिती तेल्हाराचे गटविकास अधिकारी श्री. भरत चव्हाण, पंचायत समिती अकोटचे गटविकास अधिकारी श्री. किशोर शिंदे,बुलढाणा जिल्ह्यातील पंचायत समिती लोणारचे गटविकास अधिकारी श्री. उमेश देशमुख यांचा समावेश होता.



या बाहेरील राज्याच्या अभ्यास दौरा कार्यक्रमात राज्यस्तरीय यंत्रणेच्या अधिकाऱ्यांशी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना व त्यांच्या राज्यातील राज्य पुरस्कृत आवास योजनांची प्रगती, त्यांची कार्यपध्दती आणि उपाय योजना, उद्दिष्टपूर्तीसाठीचे नियोजन व नावीन्यपूर्ण उपक्रम याबाबत चर्चा केली. तसेच क्षेत्रीय भेटीत घरकुलांची पहाणी, अधिकारी, लाभार्थी व ग्रास्थांशी चर्चा केली.

## मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प संचालक यांची राज्यस्तरी आढावा बैठक

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक ०४ ऑक्टोबर, २०२२ रोजी Four Points by Sheraton, Vashi, Navi Mumbai येथे राज्यस्तरीय आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीला राज्यातील सर्व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक उपस्थित होते.

या बैठकीमध्ये डॉ. राजाराम दिघे यांनी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या भौतिक व आर्थिक प्रगती बाबत जिल्हानिहाय सादरीकरण केले. तसेच राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध नावीन्यपूर्ण उपक्रमांबाबत मार्गदर्शन केले.

मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांनी ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रगती बाबत जिल्हानिहाय आढावा घेतला. तसेच सर्व प्रकल्प संचालक यांना उद्दिष्टपूर्तीच्या नियोजनाबाबत विचारणा केली. तसेच राज्यात बहुमजली इमारती, गृहसंकुले, हाऊसिंग अपार्टमेंट, कॉप-शॉप, घरकुल मार्ट, इ.ची उभारणी असे नावीन्यपूर्ण उपक्रम कौतुकास्पद असून यामुळे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात महाराष्ट्र राज्य देशात अग्रस्थानी आहे. याबद्दल मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी सर्व प्रकल्प संचालक यांचे अभिनंदन करत भविष्यात यापेक्षाही भरीव कामगिरीची अपेक्षा असल्याचे सांगितले.



## अमृत महा आवास अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांच्या आढावा बैठका व क्षेत्रिय भेटी

राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवासयोजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतीमानता व गुणवत्ता आणणेसाठी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या आवास दिनापासून अमृत महा आवास अभियान २०२२-२३ राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी दिनांक १४/१२/२०२२ रोजी सकाळी ११ वाजता मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांचे अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली.

या बैठकीला दूरदृष्य प्रणालीव्दारे सर्व उपायुक्त (विकास), जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता उपस्थित होते.

या बैठकीमध्ये डॉ.राजाराम दिघे यांनी अभियानातील १० उपक्रमांच्या प्रगती बाबत सादरीकरण केले. त्यानुसार अभियान कालावधीत सर्व उपक्रमावर लक्ष केंद्रीत करून जास्तीत घरकुले पूर्ण करण्यासाठी अमृत महा आवास अभियानांतर्गत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी व अभियानाची प्रचार, प्रसिध्दी करण्याच्या सूचना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी केल्या.

त्याचप्रमाणे दिनांक २६/१२/२०२२ रोजी नागपूर जिल्हा परिषद येथे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांचे अध्यक्षतेखाली व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांच्या उपस्थितीत अमृत महा आवास अभियानाचा आढावा घेतला. या बैठकीला जिल्हा परिषद






नागपूरच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती सौम्या शर्मा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. कमलकिशोर फुटाणे, प्रकल्प संचालक श्री. विवेक इलमे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विपुल जाधव इतर विभाग प्रमुख व जिल्हा प्रोग्रामर राहुल पाटील उपस्थित होते.

या बैठकीमध्ये अमृत महा आवास अभियानाच्या १० उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार सर्व घरकुलांना दिनांक ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत मंजुरी देणे, मंजूर घरकुलांना पहिला हप्ता त्वरीत वितरण करणे, प्रलंबित घरकुले पूर्ण करणे व सर्व लाभार्थ्यांचे आधार बेस पेमेंट करणे, भुमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, अतिक्रमण नियमानुकूल करणे, दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत सर्व घरकुले पूर्ण करणे व अभियानाच्या यशस्वीतेसाठी सर्वोत्तोपरी प्रयत्न करणे, अशा सुचना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार यांनी बैठकीला उपस्थितांना केल्या.

## अमृत महा आवास अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण संचालकांच्या आढावा बैठका व क्षेत्रिय भेटी

राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ पासून अमृत महा आवास अभियान राबविण्यात येत असून या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनसाठी राज्यस्तरावरून संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून माहे आक्टोंबर २०२२, नोव्हेंबर २०२२ व डिसेंबर २०२२ या कालावधीत राज्यातील सर्व विभागस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय ग्रामीण गृहनिर्माण संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्या नियमित आढावा बैठका घेतल्या.

या बैठकांमध्ये अमृत महा आवास अभियाना अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या १० उपक्रमांचा व सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरीय कार्यशाळा पूर्ण करणे, प्रत्येक गावात ग्राम कृती गटाचे गठन करणे, लाभार्थ्यांसाठी लाभार्थी मेळावे व बँक मेळावे आयोजित करणे, अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी विभाग, जिल्हा, तालुका व ग्रामस्तरावर होर्डिंग, बॅनर व पोस्टर लावणे, नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत बहुमजली इमारती, गृह संकुले व हाऊसिंग अपार्टमेंट उभारणे व त्यांच्या सहकारी संस्था स्थापन करणे अशा सुचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी उपस्थितांना केल्या.

त्याचप्रमाणे अधिवेशन काळात डॉ. राजाराम दिघे यांनी अमृत महा आवास अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनसाठी नागपूर व अमरावती विभागातील जिल्ह्यात क्षेत्रिय भेटी केल्या. यामध्ये दिनांक २२/१२/२०२२ रोजी पंचायत समिती सेलू येथे भेट देवून डेमो हाऊसची पाहणी व दिनांक २३/१२/२०२२ रोजी सेलू तालुक्यातील हिंगणी ग्रामपंचायतीला भेट देवून घरकुलची पाहणी केली व महिला बचत गटांना घरकुल मार्ट सुरू करणेसाठी प्रोत्साहीत केले. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा वर्धाचे प्रकल्प संचालक श्री. सिद व पंचायत समिती सेलूचे गटविकास अधिकारी श्री. पानबुडे उपस्थित होते.

दिनांक २४/१२/२०२२ रोजी डॉ. राजाराम दिघे यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, भंडारा येथे अभियानातील १० उपक्रमांचा आढावा घेतला याप्रसंगी पंचायत समिती भंडाराचे गट विकास अधिकारी श्री. संगमित्रा कोल्हे, प्रोग्रामर श्री.आशिष चकोले, डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. प्रफुल मडामे व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते उपस्थीत होते. भंडारा तालुक्यातील सरपेवाडा ग्रामपंचायतीतील गृह संकुलाला भेट देवून लाभार्थी व ग्रामस्थांशी चर्चा व मार्गदर्शन केले. त्याचप्रमाणे दिनांक२५/१२/२०२२ रोजी पंचायत समिती तिरोड़ा येथे भेट देवून डेमो हाउस पाहणी केलीं.

दिनांक २७/१२/२०२२ रोजी डॉ. राजाराम दिघे यांनी बुलढाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यामधील ग्रामपंचायत रिंगनवाडी येथील गृह संकुलाला भेट दिली व लाभार्थ्यांशी चर्चा केली. यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा बुलढाणाचे प्रकल्प संचालक श्री.राजेश इंगळे, विभागीय प्रोग्रामर श्री. मोहसीन आली पंचायत समिती संग्रामपूरचे गट विकास अधिकारी श्री.संजय पाटील व शेगावचे गट विकास अधिकारी श्री. देशमुख उपस्थित होते.





## घरकुल योजनांचा आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय अधिकाऱ्यांकडून क्षेत्रीय भेटी

राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालया मार्फत राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य व्यवस्थापन कक्षांच्या अधिकाऱ्यांनी क्षेत्रीय भेटी केल्या.

दिनांक १७/१०/२०२२ रोजी उपसंचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण श्रीमती मंजिरी टकले यांनी पंचायत समिती अमरावती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अमरावतीच्या प्रकल्प संचालक श्रीमती प्रीती देशमुख व विभागीय प्रोग्रामर श्री. मोहसिन अली यांच्या उपस्थित सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, जिल्हा प्रोग्रामर, जिल्हा व तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची आढावा बैठक घेतली. तसेच ग्रामीण गृहनिर्माण संबंधित तांत्रिक अडचणी बाबत मार्गदर्शन केले.

दिनांक २०/१०/२०२२ रोजी राज्य व्यवस्थापन कक्षाचे राज्य समन्वयक (माहिती व तंत्रज्ञान) श्री. राम आघाव यांनी जिल्हा परिषद परभणी येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर व विभागीय प्रोग्रामर श्री. उमेश स्वामी यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी, जिल्हा व तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर यांचा घरकुल योजनाबाबत आढावा घेतला. तसेच आवास सॉफ्ट बाबतीत तांत्रिक अडचणी बाबत चर्चा करून निराकरण करण्यात आले.

त्याचप्रमाणे श्री. राम आघाव यांनी दिनांक २१/१०/२०२२ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा नांदेड येथे प्रकल्प संचालक श्री एस. डी. तुबाकले व विभागीय प्रोग्रामर श्री. उमेश स्वामी यांच्या उपस्थितीत जिल्हा डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री मंगेश उखले, जिल्हातील सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर यांची आढावा बैठक घेवून आवास सॉफ्ट मधील तांत्रिक अडचणी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले.





## मा. खासदार यांनी घेतला ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा

दिनांक १४ ऑक्टोबर, २०२२ रोजी कोल्हापूर जिल्ह्याचे मा. खासदार श्री. धनंजय महाडिक यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची आढावा बैठक जिल्हा परिषद कोल्हापूर येथे घेण्यात आली.

या प्रसंगी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा श्रीमती शौमिका महाडिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संजयसिंह चव्हाण, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

तसेच या बैठकीला जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, जिल्हा व तालुकास्तरीय ग्रामीण गृहनिर्माण योजनांशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या घरकुलांना तात्काळ मंजूरी, सर्व हप्त्यांचे वितरण, भुमिहीन लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता, अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या कामात गति देणे व गरिब, गरजू व भूमिहीन लाभार्थ्यांना हक्काचे पक्के व दर्जेदार घरकुल देण्याच्या सूचना यावेळी मा. खासदार श्री.धनंजय महाडिक यांनी केल्या



# घरकुलांच्या कामांना गतिमान करण्याचे नियोजन करा

## मा. मंत्री, अन्न व औषध प्रशासन श्री. संजय राठोड

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ दिल्या जातो. आतापर्यत अनेक गरजवंतांना घरकूल देण्यात आले असून यापुढेही लाभार्थ्यांना मदत दिली जाणार आहे. यासाठी राज्य शासनाने अमृत महा आवास अभियान २०२२-२३ सुरु केले असून जिल्ह्यात घरकुलांची कामे गतिमान पद्धतीने करण्याचे नियोजन करावे,असे प्रतिपादन मा.मंत्री, अन्न व औषध प्रशासन तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.संजय राठोड यांनी केले.

दिनांक ३ डिसेंबर, २०२२ रोजी जिल्हा परिषद सभागृहात जागतिक दिव्यांग दिनानिमीत्त मा.मंत्री, अन्न व औषध प्रशासन तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यवतमाळ यांनी अमृत महा आवास अभियान २०२२-२३ जिल्हास्तरीय क्षमता बांधणी कार्यशाळेचे आयोजन केले होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. अमोल येडगे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा पोलिस अधीक्षक डॉ. पवन बनसोडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्रीमती. वैशाली रसाळ, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.प्रशांत थोरात, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. पंकज भोयर, जिल्हा आरोग्य अधिकारी श्री. प्रल्हाद चव्हाण, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी श्रीमती क्रांती काटोले, पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे कार्यकारी अभियंता श्री.प्रदीप कोल्हे, कृषी विकास अधिकारी श्री. राजेंद्र माळोदे, शिक्षणाधिकारी श्री.प्रमोद सूर्यवंशी, समाज कल्याण अधिकारी श्री. चव्हाण आदी विभाग उपस्थित होते.

यावेळी बोलतांना मा. पालकमंत्री श्री. संजय राठोड म्हणाले की, घरकुलापासून एकही लाभार्थी वंचित राहणार नसून शासनाकडून सर्व लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे. जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून घरकुलांची कामे केली जात असून आतापर्यंत अनेक लाभार्थ्यांना हक्काचे व पक्के घर मिळाले आहे.

या कार्यक्रमामध्ये ज्या दिव्यांग लाभार्थ्यांनी घरकुल विहित मुदतीत बांधले त्यांना मा. पालकमंत्री श्री.संजय राठोड यांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. घरकुलाच्या कामांना गतिमान करण्यासाठी कशा प्रकारचे आणि कोणत्या पद्धतीने नियोजन करावे, लाभार्थ्यांना मंजुरी ते बांधकाम पूर्ण पर्यंत कोणत्या पद्धतीने घरकुल बांधकाम करावे, भूमिहीन लाभार्थ्यांसाठी आपल्या स्तरावरून काय प्रयत्न करता येईल याबाबत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती. वैशाली रसाळ यांनी माहिती दिली.



# ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या उद्दिष्टपूर्तीसाठी नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व प्रकल्प संचालक यांच्या तालुकास्तरीय आढावा बैठका

राज्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या प्रभावी अंमलबजावणी व उद्दिष्टपूर्तीसाठी दि. १५/११/२२ रोजी पंचायत समिती बिलोली येथे जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा ठाकुर व दि. १४/११/२०२२ रोजी पंचायत समिती धर्माबाद येथे जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांनी पंचायत समित्यांना भेटी देवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या आढावा बैठका घेतल्या. या बैठकांमध्ये घरकुलांना मंजूरी, सर्व हप्त्यांचे वितरण, भूमिहीन व अतिक्रमी लाभार्थ्यांना जागेची उपलब्धता, प्रलंबित घरकुले पूर्ण करणे व घरकुलांचे काम गतिने पूर्ण करणे, अशा सूचना करण्यात आल्या.

या बैठकांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सा.) श्री.सुधीर ठोंबरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी(पा.व स्व.) श्री. नारायण मिसाळ, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (म.बा.क.) श्रीमती काळम, जिल्हा प्रोग्रामर श्री. कांदे, गट विकास अधिकारी विठ्ठल सुरोशे, गट विकास अधिकारी श्री.आर. एस. बजाज, विस्तार अधिकारी श्री. जाधव, श्री. उडतेवार, श्री. योगेश वाघ, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते, सर्व ग्रामसेवक व तालुकास्तरावरील इतर अधिकारी उपस्थित होते.



## मुख्य कार्यकारी अधिकारी पालघर यांनी घेतला ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा

दिनांक २२/११/२०२२ रोजी जिल्हा परिषद पालघर येथे मुख्य कार्यकारी अधीकारी श्री. भानुदास पालवे यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. रविंद्र शिंदे यांच्या उपस्थितीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीला पालघर जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा पालघरचे सहाय्यक प्रकल्प संचालक श्रीमती.प्रतिभा भागवत, जिल्हा प्रभारक श्री. धनंजय पाटील, जिल्हा डेटा ऐन्ट्री ऑपरेटर श्री. कमलेश गुणगुणे व तालुक्यातील घरकुल कामकाज पाहणारे विस्तार अधिकारी, कनिष्ठ सहाय्यक, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर व सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते उपस्थित होते.

या बैठकीमध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजना घरकुलांना मंजूरी देणे, सर्व हप्त्यांचे वितरण वेळेत करणे व माहे डिसेंबर २०२२ अखेर सर्व अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याच्या सुचना मुख्य कार्यकारी अधीकारी श्री. भानुदास पालवे यांनी केल्या. तसेच घरकुल उद्दिष्टपूर्तीचे काम गतीने व नियोजनबद्ध पध्दतीने करण्याचे प्रकल्प संचालक श्री.रविंद्र शिंदे यांनी सांगितले.



## ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे काम युध्दपातळीवर करणे गरजे आहे

### - श्री. रोहन घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वर्धा

दिनांक ३०/११/२०२२ रोजी पंचायत समिती सेलू व दिनांक १४/१२/२०२२ रोजी पंचायत समिती वर्धा येथे जिल्हा परिषद वर्धाचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रोहन घुगे यांच्या अध्यक्षतेखाली व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. विश्वास सिद, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमोल भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या आढावा बैठकी घेण्यात आल्या.

या बैठकांना सेलू व वर्धा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी, उप अभियंता, विस्तार अधिकारी, डेटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंते व संबंधित तालुक्यातील सर्व ग्रामसेवक उपस्थित होते.

या बैठकांमध्ये सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांचा आढावा घेण्यात आला. त्यानुसार ग्रामीण गृहनिर्माण योजनांचे काम युद्धपातळीवर करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे यांनी केल्या. तसेच दिनांक १४/१२/२०२२ रोजी श्री. रोहन घुगे यांनी वर्धा तालुक्यातील डोरली, आंजी (मोठी), पुलई, पेठ, या गावांना भेटी घरकुलांची पहाणी करून लाभार्थ्यांना व ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.



## अमृत महा आवास अभियानात घरकुले गतिमानतेने पूर्ण करण्यासाठी अकोला येथे बैठक

दिनांक १२/१२/२०२२ रोजी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा अकोला येथे प्रकल्प संचालक श्री. शेखर रौंदळ यांनी अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अंतर्गत सर्व उपक्रमांचा आढावा घेतला. या बैठकीला जिल्हा प्रोग्रामर श्री. श्रीकांत वाघमारे, जिल्हा ऑपरेटर श्री. तुषार भेंडे यांच्यासह जिल्हा, तालुकास्तरावरील सर्व संबंधित अधिकारी, कर्मचारी व सर्व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते उपस्थित होते.

या बैठकीमध्ये अमृत महा आवास अभियानातील उपक्रमांवर भर देऊन घरकुले लवकरात लवकर पूर्ण करणे व अभियानात ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांची भुमिका व जबाबदारी बाबत श्री. शेखर रौंदळ यांनी मार्गदर्शन केले.



# परभणीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून गतीने घरकुल पूर्णत्वासाठी बैठक

दिनांक १५/१२/२०२२ रोजी जिल्हा परिषद परभणीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विनय मुन यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती रश्मी खांडेकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. संदिप घोन्सिकर, यांच्या प्रमुख उपस्थितीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजनांची आढावा बैठक जिल्हा परिषद परभणी येथे घेण्यात आली.

या बैठकीमध्ये मंजूर घरकुलांचे काम गतीने पूर्ण होणेसाठी पहिल्या हप्त्या ७ दिवसात वितरीत करणे, घरकुल पूर्णत्वाचे प्रमाण वाढविणे, गट विकास अधिकारी यांनी लाभार्थी व ग्रामसेवक यांचे कॅम्प घेऊन घरकुलांना मंजुरी, सर्व हप्ते वितरण व रिमांड कसेसची कार्यवाही करणे तसेच अमृत महा आवास अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.विनय मुन यांनी केल्या.

या बैठकीला जिल्ह्यातील सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, डेटा एन्ट्री ऑपरेटर,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी 'लोक अदालत' प्रभावी माध्यम

राज्यात अमृत महा आवास अभियान २०२२-२३ अतंर्गत विविध उपक्रम राबवून ग्रामीण भागातील लोकांचे पक्क्या घरकुलाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सर्वस्तरावरून प्रयत्न करण्यात येत आहे. परंतु काही घरकुल लाभार्थ्यांनी घरकुल मंजूर झाल्यावर पहिला हप्ता घेवून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी उलटून अद्यापही घरकुल बांधकामास सुरूवात केली नाही. अशा लाभार्थ्यांना वारंवार बैठका, लाभार्थी मेळावे, गृह भेटी व इतर सर्व मार्गाने समजावण्याचा प्रयत्न करण्यात आले. परंतु सदर लाभार्थ्यांची घरकुल बांधकाम न करण्याची भूमिका जैसे थे आहे. अशा प्रलंबित घरकुल लाभार्थ्यांसाठी तालुकास्तरावर कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने 'लोक अदालत' द्वारे लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करण्यात येत असून 'लोक अदालत' प्रलंबित घरकुले पूर्ण करण्यासाठी प्रभावी माध्यत ठरले आहे.

पुणे जिल्ह्यात दि. १२/११/२०२२ रोजी सासवड न्यायालयात राष्ट्रीय लोक अदालत मध्ये प्रलंबित घरकुल लाभार्थ्यांना बोलवून मा.न्यायमुर्ती भरड यांनी लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम तातडीने सुरू करणे बाबत समज दिली.

त्याचप्रमाणे दि.१२/११/२०२२ रोजी अमरावती जिल्ह्यातील चिखलदारा, चांदुर रेल्वे, दर्यापूर, धारणी, मोर्शी, अमरावती, तिवसा, धामणगाव रेल्वे, अचलपूर व नांदगाव खंडेश्वर तालुक्यांमध्ये प्रलंबित घरकुल लाभार्थ्यांसाठी लोक अदालत आयोजित करण्यात आली.

या लोक अदालतीमध्ये प्रलंबित घरकुल लाभार्थ्यांसह संबंधित पंचायत समितीचे गटविकास अधिकारी,विस्तार अधिकारी, कानिष्ठ अभियंता व ग्रामीण गृहनिर्माण अभियंते उपस्थित होते.

या लोक अदालत मध्ये लाभार्थ्यांची सुनावणी घेवून घरकुल प्रलंबित राहण्या मागच्या कारणांची विचारणा करण्यात आली. तसेच त्यांना घेतलेल्या पहिल्या हप्त्याच्या निधीबाबतही विचारणा करण्यात आली. जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास तयार आहेत, अशा लाभार्थ्यांना तात्काळ घरकुल बांधकाम करण्याचे सूचित करण्यात आले. परंतु जे लाभार्थी घरकुल बांधकाम करण्यास इच्छुक नाही अशा लाभार्थ्यांनी तात्काळ पहिला हप्ता जमा करून शासनाच्या नियमानुसार रिमांड करण्याची प्रक्रीया करण्यात आली. सर्व प्रलंबित घरकुल लाभार्थ्यांवर कायदेशीर कार्यवाही केल्याने घरकुल बांधकामात गती आली असून प्रलंबित घरकुलांच्या संख्येत घट झाली आहे.

लोक अदालत सारखा उपक्रम राबविल्यामुळे प्रलंबित घरकुल बांधकाम पूर्ण होण्यास मदत झाली असून नव्याने मंजूर झालेली घरकुले पहिला हप्ता मिळताच लाभार्थी तात्काळ बांधकाम करण्यास सुरूवात करीत आहे.





## मा. मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, मा. विधानसभा अध्यक्ष, मा. ग्राम विकास व पंचायत राज मंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय पुरस्कार वितरण

दिनांक २४ नाव्हेंबर, २०२२ रोजी महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना महाराष्ट राज्याचे मा.मुख्यमंत्री, श्री. एकनाथ शिंदे यांचे शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, श्री. देवेंद्र फडणवीस, मा. विधानसभा अध्यक्ष, ॲड. राहुल नार्वेकर, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. गिरीष महाजन, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री. राजेश कुमार व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ.राजाराम दिघे यांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

या कार्यक्रमात महा आवास अभियान-ग्रामीण २०२०-२१ मध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजना अंतर्गत उत्कृष्ट कामगिरीसाठी सर्वोत्कृष्ट विभाग, सर्वोत्कृष्ट जिल्हे, सर्वोत्कृष्ट तालुके, सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायती, सर्वोत्कृष्ट घरकुल, सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारती, सर्वोत्कृष्ट गृह संकुले व सर्वोत्कृष्ट सहकारी संस्था करीता प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक असे पुरस्कार वितरण करण्यात आले तर वैयक्तिक कामगिरीसाठी राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी यांना उत्कृष्ट कामगिरीसाठी पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

याप्रसंगी राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक, पंचायत समितीचे सभापती, पंचायत समिती गट विकास अधिकारी, पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, सहकारी संस्थेचे प्रतिनिधी, बँक प्रतिनिधी, पत्रकार, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे राज्यस्तरीय अधिकारी कर्मचारी व सर्व पुरस्कारार्थी उपस्थित होते.



## अमृत महा आवास अभियान २०२२-२३ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळेत विविध माहिती, शिक्षण व संवाद साहित्यांचे प्रकाशन

दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री यांचे शुभहस्ते व मा. उप मुख्यमंत्री, मा. विधानसभा अध्यक्ष, मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग व संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे प्रमुख उपस्थितीत अमृत महा आवास अभियान २०२२-२३ च्या राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने प्रकाशित केलेल्या माहिती, शिक्षण व संवाद साहित्याचे प्रकाशन करण्यात आले.

यामध्ये अमृत महा आवास अभियान २०२२-२३ बाबत भागधारक, लाभार्थी व लोक यांना मार्गदर्शक ठरणारी अभियान पुस्तिक, अभियानाच्या प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृतीसाठी अभियान पोस्टर, ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्राचा मागोवा घेणारे महा आवास त्रैमासिक व महा आवास अभियान राज्यस्तरीय पुरस्करा विजेत्यांची यशकथा सांगणारे गौरवगाथा पुस्तक, इ. चे प्रकाशन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले.

'अमृत महा आवास अभियान २०२२-२३' ची प्रचार, प्रसिध्दी व जन-जागृती विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व ग्रामस्तरावर प्रभावी व्हावी, याकरीता राज्य





व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने निर्मिती केलेले होर्डिंग, बॅनर व पोस्टरचे डिजाईन सर्व स्तरावर इ-मेलव्दारे पाठवून प्रिटींग करून दर्शनीय ठिकाणी लावण्याच्या सूचना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी सर्व अंमलबजावणी यंत्रणांना केल्या आहे.

## अमृत महा आवास अभियान २०२२-२३ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी विविध माहिती, शिक्षण व संवाद साहित्याचे प्रदर्शन

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता येण्यासाठी राज्यात दिनांक २४ नोव्हेंबर, २०२२ रोजी अमृत महा आवास अभियान २०२२-२३ या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ यशंवतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे संपन्न झाला.

या कार्यशाळेकरीता राज्यातील सर्व स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी, लाभार्थी व लोक उपस्थित होते. या कार्यक्रमाकरीता आलेल्या सर्व आमंत्रितांना ग्रामीण गृहनिर्माण योजनांबाबत माहिती व्हावी, याकरीता राज्य व्यवस्थापन कार्यालयाने राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाची भूमिका व जबाबदारी, स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत करावयाची कामे, राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना व अमृत महा आवास अभियान २०२२-२३ चे उद्देश व राबवावयाचे उपक्रम, इ. बाबत स्टॅण्डीची उभारणी केली होती. त्याचप्रमाणे अभियानाचे होर्डींग व थ्रीडी घरकुल मॉडल प्रदर्शित करण्यात आले. या घरकुल मॉडेल समोर मान्यवरांसह आमंत्रित सर्व अधिकारी पदाधिकारी व पुरस्कार्थी यांनी फोटो काढले.



## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संकल्पनेतून व प्रकल्प संचालक यांच्या मार्गदर्शनाखाली "दिवाळी नवीन घरात-धनत्रयोदशीला गृहप्रवेश" उपक्रम औरंगाबाद जिल्हात राबविला

दिनांक २२ ऑक्टोबर, २०२२ रोजी औरंगाबाद जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विकास मीना यांच्या संकल्पनेतून व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व आवास योजनांच्या लाभार्थ्यांसाठी "दिवाळी नवीन घरात-धनत्रयोदशीला गृहप्रवेश" उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमामध्ये आपला सक्रीय सहभाग नोंदवत श्री. विकास मीना व श्रीमती संगीतादेवी पाटील सिल्लोड तालुक्यातील ग्रामपंचायत गव्हाली भेट देऊन लाभार्थ्यांना घरकुलाचे कुलूप व चावी भेट म्हणून दिली. तसेच उपस्थितांना विविध घरकुल योजना विषयी मार्गदशन व घरकुल बांधकामाकरीता प्रोत्साहीत केले. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. विकास मीना व प्रकल्प संचालक श्रीमती संगीतादेवी पाटील यांनी पंचायत समिती सिल्लोड येथे भेट देवून डेमो हाऊसचे लोकार्पण केले.



## मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे शुभहस्ते भूमिपूजन, गृहप्रवेश व पहिला हप्ता वितरण

दिनांक १७/११/२०२२ रोजी नांदेड जिल्ह्यातील हदगाव तालुक्यांतर्गत ग्रामपंचायत पिंपळगाव येथे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर यांचे शुभहस्ते घरकुल लाभार्त्यांचे भूमिपूजन, पूर्ण झालेल्या घरकुलांचे गृहप्रवेश व प्रथम हप्ता वितरण करण्यात आले.

यावेळी जिल्हा परिषदेचे उ पमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. नारायण मिसाळ व पंचायत समिती हदगावचे गटविकास अधिकारी श्री. उमेशजी मुदखेडे उपस्थित होते.



## भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्धतेसाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

दिनांक ०३ नोव्हेंबर, २०२२ रोजी केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व इतर राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत राज्यात भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध करून देण्याच्या कामात गतीमानतेसाठी मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन श्री. मनुकुमार श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय कृतीदलाची बैठक मा. मुख्य सचिव यांचे दालन, मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

या बैठकीला मा. अतिरिक्त मुख्य सचिव, महसूल विभाग, मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, उप सचिव, केंद्रिय योजना, ग्राम विकास विभाग व सदस्य सचिव, राज्यस्तरीय कृतीदल तथा संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण उपस्थित होते. सर्व मा. विभागीय आयुक्त या बैठकीला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करूण देणे बाबतचे उद्दिष्ट, त्याकरीता येणाऱ्या अडचणी व त्याकरीता केलेल्या उपाय योजना तसेच इतर मार्गाने उपलब्ध असलेली जागा, जागेच्या अडचणी करीता राज्यात राबविलेले नावीन्यपूर्ण उपक्रम याबाबतचे सादरीकरण संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, डॉ. राजाराम दिघे यांनी केले.




## मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांची महाराष्ट्रात समन्वय बैठक

दिनांक १७/११/२०२२ रोजी मा. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार श्री.नरेंद्र नाथ सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली व महाराष्ट्र शासनाचे मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागा अंतर्गत सर्व योजनांच्या विभाग प्रमुखांची बैठक बांधकाम भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला ग्राम विकास विभागाच्या इतर अधिकाऱ्यासह संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये केंद्राच्या विविध योजनांच्या प्रगतीचा आढावा, उदयोन्मुख समस्या, सर्वोत्तम पद्धती आणि विविध कार्यक्रमांमध्ये चांगल्या अंमलबजावणीसाठी आणि अभ्यासक्रम सुधारण्यासाठी धोरणांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये PMGSY, MGNREGS, PMAY-G, DAY-NRLM, DDU-GKY, NSAP, SPMRM, SAGY आणि DISHA या योजनांचा प्राधान्याने समावेश होता.




## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व स्वदेश फाऊंडेशन यांची समन्वय बैठक

दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण व स्वदेश फाऊंडेशन यांच्यात समन्वय बैठक संपन्न झाली. या बैठकीला राज्य व्यस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे संचालक डॉ. राजाराम दिघे, प्रशिक्षण समन्वयक (वास्तुविशारद) श्री. परमेश्वर शेलार, स्वदेश फाऊंडेशनचे संचालक श्री.बेजॉय चिकामेल, श्री.राहुल कटारीया व उपसंचालक श्री. तुषार इनामदार उपस्थित होते.

या बैठकीमध्ये घरकुल बांधकामात गुणवत्ता येण्यासाठी व लाभार्थ्यांना मुलभूत नागरी सुविधा स्वदेश फाऊंडेशनच्या माध्यमातून पुरविण्यासाठी सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्यानुसार सद्या ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात सुरू असलेल्या कामांबाबत डॉ. राजाराम दिघे यांनी सविस्तर माहिती स्वदेश फाऊंडेशनला दिली.



## मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग यांची राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाला भेट

दिनांक ०७ डिसेंबर, २०२२ रोजी मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग, श्री.राजेश कुमार यांनी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई येथे भेट देवून कार्यालयाची पाहणी केली. तसेच कार्यालयातील अधिकारी यांचेशी केंद्र व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनाच्या प्रगतीचा आढावा घेतला.

याप्रसंगी संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे, ग्राम विकास विभागाचे उप सचिव श्री. जाधव, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती मिशनचे श्री. राऊत, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण राज्य योजनेच्या उपसंचालक श्रीमती मंजिरी टकले व राज्य व्यवस्थापन कक्षाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.



## घरकुल बांधकामासठी जागेच्या उपलब्धतेसाठी जिल्हाधिकारी वर्धा यांनी घेतला आढावा

दिनांक १२/१२/२०२२ रोजी भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी जागेच्या उपलब्धतेसाठी वर्धा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. रोहन घुगे यांच्या प्रमुख उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री. विश्वास सिद, उपविभागीय अधिकारी श्री. सुरेश बगळे, सर्व तहसिलदार व सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीमध्ये प्रकल्प संचालक श्री. विश्वास सिद यांनी भूमिहीन लाभार्थ्यांच्या जागा उपलब्धतेबाबत सादरीकरण केले. त्यानुसार जिल्हाधिकारी श्री. राहुल कर्डिले यांनी घरकुल लाभार्थ्यांना त्यांचे हक्काचे घर देण्यासाठी शासकीय जाग विनामुल्य देणे व अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या सूचना केल्या.




## ग्राम विकास व महसूल यांच्या समन्वयातून २००० पेक्षा जास्त लाभार्थ्यांना जागा उलब्ध

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देण्याकरिता अमरावती जिल्ह्यातील पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर व दुय्यम निबंधक कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कॅम्पचे आयोजन करून बक्षीसपत्र करून देण्यात आले. कमीत कमी खर्चामध्ये रक्तातील नात्याचे बक्षीस पत्र करून देऊन लाभार्थ्यांना ५०० स्कु. फूट जागा उपलब्ध करून देऊन घरकुलांना मंजूरी देण्यात आली. या कॅम्पव्दारे पंचायत समिती व दुय्यम निबंधक कार्यालयाचे सहकार्याने जवळपास २२ लाभार्थ्यांचे बक्षीस पत्र करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती नांदगाव खंडेश्वर गटविकास अधिकारी श्री. प्रकाशजी नाटकर, दुय्यम निबंधक श्री. चक्रे, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री.विठ्ठल जाधव, दुय्यम निबंध कार्यालयातील व पंचायत समिती कार्यालयातील डेटा एन्ट्री ऑपरेटर श्री. मनीष मदनकर व वाटपुर उपस्थित होते.

घरकुला साठी जागा नसलेल्या भूमिहीन लाभार्थ्यांना शासनाच्या इ वर्ग/एफ वर्ग शासकीय जमिनीमधून, रक्ताच्या नात्याची बक्षिसंपत्राद्वारे, पंडित दीनदयाल उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना व गावठाण अतिक्रमण नियमाकुल करणे इ.योजनेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात जागा उपलब्ध करून देण्याची मोहीम हाती घेवून २००० चे वर भूमिहीन लाभार्थीना जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.



# केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधी पॉलिसी इनपुट



## स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सानिमित्त अमृत महा आवास अभियान २०२२-२३

"सर्वांसाठी घरे-२०२४" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना राबविण्यात येत असून त्यांना पूरक पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना अशा योजनाही राबविण्यात येत आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals) मधील ध्येय क्रमांक ११ नुसार किफायतशीर गृहनिर्माण (Affordable Housing) क्षेत्रात काम झाल्यास एकूण १७ SDG पैकी किमान १४ SDG वर सकारात्मक प्रभाव पडणार आहे. यासाठी घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक राहवी, नावीन्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त असे घरकुले उपलब्ध करुन द्यावीत, तसेच नैसर्गिक आपत्तीस सक्षमपणे सामोरे जाणारे घरकुले बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय आहे.

यासाठी राज्यात दिनांक २० नोव्हेंबर, २०२० ते दिनांक ०५ जून, २०२१ या कालावधीत महा आवास अभियान-ग्रामीण राबविण्यात आले. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये आलेली गतिमानता व गुणवत्ता सातत्याने राहण्यासाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२२ या कालावधीत महा आवास अभियान २.० राबविण्यात आले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात जलद गतिने लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ मिळावा यासाठी दिनांक ०१ जुलै, २०२२ ते दिनांक १५ ऑगस्ट, २०२२ या कालावधीत अमृत घरकुल मोहीम राबविण्यात आली.

त्याचप्रमाणे ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात ग्राम विकास व पंचायत राज विभागा अंतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयामार्फत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात आले. यामध्ये जेथे घरकुल बांधकामासाठी जागेची कमतरता आहे अशा ठिकाणी बहुमजली इमारती, जेथे जागेची उपलब्धता आहे अशा ठिकाणी गृह संकुले, जागेच्या वाढत्या किंमती लक्षात घेता हाऊसिंग अपार्टमेंट, डेमो हाऊस मध्ये कॉप-शॉप, घरकुल बांधकाम साहित्य वाजवी दरात व नजीकच्या ठिकाणी उपलब्धतेसाठी घरकुल मार्ट, प्रशिक्षित गवंडी उपलब्धतेसाठी गवंड्यांचे पॅनेल तयार करणे, लाभार्थी व लोकांना मार्गदर्शनासाठी महा आवास हेल्प लाईन, रिलाअन्स, हुडको, आय.आय.टी. बॉम्बे, या सारख्या नामांकीत संस्थांशी भागिदारी, या सारखे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राज्यात राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांचे कौतुक देशपातळीवरही होत आहे.

ग्राम विकास विभागांतर्गत राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाला ग्रामीण गृहनिर्माण योजना संबंधित अनेक इनपूट दिले आहे. त्याचाच एक भाग म्हणून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ही योजना देशात दिनांक २० नोंव्हेंबर, २०१६ पासून अंमलात आली असून **दरवर्षी २० नोव्हेंबर हा 'राष्ट्रीय आवास दिन'** म्हणून राबविण्यात येतो. या वर्षी भारत सरकारच्या सूचनांनुसार आपण आझादी का अमृत महोत्सव राबवत आहोत. त्याचे औचित्य साधून दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ पासून राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी अभियान राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्यात दिनांक **२० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिना पासून ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीत "अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** राबविण्यात येत आहे. "सर्वांसाठी घरे-२०२४" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता आणणे हा या अभियानाचा हेतू आहे. या अभियानामुळे लाखो गरिब, गरजू, बेघर व भूमिहीन लाभार्थांचे स्वतःच्या पक्क्या, हक्काच्या व दर्जेदार घरकुलाची स्वप्नपूर्ती होणार आहे. **"अमृत महा आवास अभियान २०२२-२३"** राज्य व देशाच्या ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासाठी निश्चित प्रेरणादायी असणार आहे.



# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट (PWL+Awaas+) | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक | राष्ट्रीय रँक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | ९६३८७ | ९३४२९ | ८०१४४ | ८५.७८% | २ | २५३ |
| २ | नागपूर | ३७५१९ | ३५८१५ | २९१८१ | ८१.५% | ४ | ५०३ |
| ३ | भंडारा | ६५४४८ | ६२२७३ | ४८०६६ | ७७.२% | ८ | ४३८ |
| ४ | वर्धा | १८६९२ | १७५०४ | १३३९३ | ७६.५% | ९ | ३९७ |
| ५ | चंद्रपूर | ४३८२४ | ३९७०० | २८५८१ | ७२.०% | १५ | २८९ |
| ६ | गडचिरोली | ३१५७४ | ३११८३ | २१९५० | ७०.४% | १८ | ३४४ |
| नागपूर विभाग | | २९३४४४ | २७९९०४ | २२१३१५ | ७९.१% | १ | |
| ७ | नाशिक | ८९८०४ | ८७६४६ | ७२१८५ | ८२.४% | ३ | २५९ |
| ८ | नंदुरबार | ११९२१२ | ११४६६८ | ९३३९५ | ८१.४% | ५ | ३८९ |
| ९ | धुळे | ६४८२४ | ६३५३९ | ४६४९८ | ७३.२% | १३ | ३१२ |
| १० | अहमदनगर | ६१७०० | ५८५९५ | ४२३५४ | ७२.३% | १४ | ४६५ |
| ११ | जळगाव | ८०३६८ | ७७६४९ | ५२३८७ | ६७.५% | २० | ५१६ |
| नाशिक विभाग | | ४१५९०८ | ४०२०९७ | ३०६८१९ | ७६.३% | २ | |
| १२ | रायगड | ९८८२ | ९७५२ | ८४५९ | ८६.७% | १ | ३२६ |
| १३ | सिंधुदुर्ग | ५२९५ | ५०६४ | ३७८३ | ७४.७% | १० | २४३ |
| १४ | पालघर | ३४९३२ | ३४७६५ | २५५३३ | ७३.४% | १२ | २४६ |
| १५ | ठाणे | ९६१५ | ९२४० | ६६२३ | ७१.७% | १७ | २६५ |
| १६ | रत्नागिरी | १०००८ | ९८९४ | ६५६२ | ६६.३% | २१ | १३६ |
| कोकण विभाग | | ६९७३२ | ६८७१५ | ५०९६० | ७४.२% | ३ | |
| १७ | पुणे | २२६०८ | १८३५५ | १३५३२ | ७३.७% | ११ | ५१५ |
| १८ | कोल्हापूर | १८०५१ | १७६४९ | १२६८१ | ७१.९% | १६ | २२७ |
| १९ | सोलापूर | ५३३०८ | ४५९९२ | ३१७७८ | ६९.१% | १९ | ४९८ |
| २० | सांगली | २२६६७ | २१२३८ | १३९३२ | ६५.६% | २२ | ५०७ |
| २१ | सातारा | १५९१० | १५७४६ | १००४७ | ६३.८% | २३ | ४३३ |
| पुणे विभाग | | १३२५४४ | ११८९८० | ८१९७० | ६८.९% | ४ | |
| २२ | अकोला | ४९८४१ | ४४९६८ | ३५४६१ | ७८.९% | ६ | ४९७ |
| २३ | अमरावती | ९५८३६ | ८५०१० | ६६०२२ | ७७.७% | ७ | ५२५ |
| २४ | यवतमाळ | ६५५३४ | ६१०२१ | ३७९०९ | ६२.१% | २४ | ३०२ |
| २५ | बुलढाणा | ४४८४७ | ४०७८६ | २३१३४ | ५६.७% | २७ | ४१५ |
| २६ | वाशिम | २०६११ | १९२७८ | ८६३७ | ४४.८% | ३२ | ३८४ |
| अमरावती विभाग | | २७६६६९ | २५१०६३ | १७११६३ | ६८.२% | ५ | |
| २७ | हिंगोली | १८१२३ | १५८३८ | ९६२७ | ६०.८% | २५ | २१२ |
| २८ | जालना | २४१८२ | २१०७१ | ११९६४ | ५६.८% | २६ | ३३० |
| २९ | औरंगाबाद | ३६९४२ | ३६२७७ | २०५७५ | ५६.७% | २८ | २७९ |
| ३० | नांदेड | ६९७७७ | ६६५४५ | ३५४९५ | ५३.३% | २९ | ५१० |
| ३१ | बीड | ३५४११ | ३३१७५ | १७२८७ | ५२.१% | ३० | ३७३ |
| ३२ | लातूर | २०९१२ | १९७०६ | ९१०६ | ४६.२% | ३१ | ४४७ |
| ३३ | उस्मानाबाद | १४६९२ | १२५२४ | ५३९४ | ४३.१% | ३३ | २५१ |
| ३४ | परभणी | १९१५० | १८२१२ | ६५९३ | ३६.२% | ३४ | २२६ |
| औरंगाबाद विभाग | | २३९१८९ | २२३३४८ | ११६०४१ | ५२.०% | ६ | |
| एकूण | | १४२७४८६ | १३४४१०७ | ९४८२६८ | ७०.६% | | |

# रमाई आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | रत्नागिरी | ६६८४ | ६३२० | ५४४० | ८६.१% | १ |
| २ | सिंधुदुर्ग | २०३१ | २०२९ | १६९१ | ८३.३% | ३ |
| ३ | रायगड | २०३९ | २०२८ | १६०९ | ७९.३% | ७ |
| ४ | ठाणे | १२५६ | ११७४ | ९०३ | ७६.९% | ११ |
| ५ | पालघर | ४९८ | ४५८ | ३५१ | ७६.६% | १२ |
| कोकण विभाग | | १२५०८ | १२००९ | ९९९४ | ८३.२% | १ |
| ६ | सातारा | १०३२८ | १०२८५ | ८७०२ | ८४.६% | २ |
| ७ | कोल्हापूर | १२४४३ | १२४४३ | १०२३७ | ८२.३% | ५ |
| ८ | सोलापूर | १७६८९ | १७५४१ | १३३६९ | ७६.२% | १३ |
| ९ | सांगली | ८६१४ | ८४९५ | ६३९५ | ७५.३% | १४ |
| १० | पुणे | ९५१७ | ९४५९ | ६९१८ | ७३.१% | १६ |
| पुणे विभाग | | ५८५९१ | ५८२२३ | ४५६२१ | ७८.४% | २ |
| ११ | भंडारा | १२४८० | १०६७७ | ८८०२ | ८२.४% | ४ |
| १२ | नागपूर | ८०३९ | ७८७० | ६४५७ | ८२.०% | ६ |
| १३ | गोंदिया | १०१२७ | ९१४६ | ७०८९ | ७७.५% | १० |
| १४ | चंद्रपूर | २२८७३ | १६८६७ | १२५१६ | ७४.२% | १५ |
| १५ | गडचिरोली | ६८८० | ६६२७ | ४७८९ | ७२.३% | १७ |
| १६ | वर्धा | ७५०९ | ७४५३ | ५२६५ | ७०.६% | २१ |
| नागपूर विभाग | | ६७९०८ | ५८६४० | ४४९१८ | ७६.६% | ३ |
| १७ | अहमदनगर | २८४३४ | २८०९२ | २२०६५ | ७८.५% | ९ |
| १८ | नाशिक | १२३३८ | १११७३ | ७९३२ | ७१.०% | २० |
| १९ | जळगाव | १६७५८ | १६१४५ | ११२३४ | ६९.६% | २२ |
| २० | नंदुरबार | ३५२२ | ३३२५ | २०४६ | ६१.५% | २८ |
| २१ | धुळे | ८५४९ | ८४०३ | ५०१९ | ५९.७% | ३१ |
| नाशिक विभाग | | ६९६०१ | ६७१३८ | ४८२९६ | ७१.९% | ४ |
| २२ | यवतमाळ | १४३४१ | १४३१० | १०२१४ | ७१.४% | १९ |
| २३ | अकोला | १८०९२ | १४४५७ | ९९३० | ६८.७% | २४ |
| २४ | अमरावती | १४९३७ | १३२५७ | ९०२९ | ६८.१% | २५ |
| २५ | वाशिम | ९१६६ | ९१०२ | ५५८८ | ६१.४% | २९ |
| २६ | बुलढाणा | १८५५४ | १८२६५ | १०२९० | ५६.३% | ३२ |
| अमरावती विभाग | | ७५०९० | ६९३९१ | ४५०५१ | ६४.९% | ५ |
| २७ | परभणी | १६८४१ | १५२७९ | १२१०७ | ७९.२% | ८ |
| २८ | औरंगाबाद | २२२३३ | १६४८२ | ११८०८ | ७१.६% | १८ |
| २९ | लातूर | २६२४२ | २३०५८ | १६०२६ | ६९.५% | २३ |
| ३० | नांदेड | २१३०० | १५१६० | ९९१० | ६५.४% | २६ |
| ३१ | हिंगोली | १४२२८ | ९३७७ | ५७७४ | ६१.६% | २७ |
| ३२ | उस्मानाबाद | २३६६४ | १४८१७ | ८९८२ | ६०.६% | ३० |
| ३३ | बीड | २५७३५ | २२६६३ | १२२८५ | ५४.२% | ३३ |
| ३४ | जालना | १९२४६ | १७८३९ | ८३६० | ४६.९% | ३४ |
| औरंगाबाद विभाग | | १६९४८९ | १३४६७५ | ८५२५२ | ६३.३% | ६ |
| एकूण | | ४५३१८७ | ४०००७६ | २७९१३२ | ६९.८% | |

# शबरी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हिंगोली | ४०३५ | ३१२४ | २७९४ | ८९.४% | ५ |
| २ | परभणी | ८८७ | ७४७ | ६२० | ८३.०% | १३ |
| ३ | नांदेड | १९९९ | १०५३ | ८५९ | ८१.६% | १५ |
| ४ | जालना | ६९४ | ५०८ | ४०८ | ८०.३% | १६ |
| ५ | लातूर | ८३१ | ५०८ | ४०३ | ७९.३% | १७ |
| ६ | औरंगाबाद | २७७३ | २४५७ | १९१२ | ७७.८% | १९ |
| ७ | बीड | ७३५ | ५२९ | ३७३ | ७०.५% | २८ |
| ८ | उस्मानाबाद | ४२४ | २८४ | १५८ | ५५.६% | ३४ |
| औरंगाबाद विभाग | | १२३७८ | ९२१० | ७५२७ | ८१.७% | १ |
| ९ | जळगाव | ६१५३ | ५२८५ | ४४४९ | ८४.२% | ८ |
| १० | नाशिक | १२४८८ | १०९२५ | ९१६१ | ८३.९% | १० |
| ११ | अहमदनगर | ४३६२ | ३९४५ | ३२९८ | ८३.६% | ११ |
| १२ | धुळे | ९७६९ | ७८५६ | ६५०५ | ८२.८% | १४ |
| १३ | नंदुरबार | १५०४६ | १०६२० | ७६०२ | ७१.६% | २७ |
| नाशिक विभाग | | ४७८१८ | ३८६३१ | ३१०१५ | ८०.३% | २ |
| १४ | सिंधुदुर्ग | ३३ | २३ | २३ | १००.०% | २ |
| १५ | रत्नागिरी | २८८ | २३२ | २११ | ९०.९% | ३ |
| १६ | ठाणे | २२०१ | १८७६ | १६८९ | ९०.०% | ४ |
| १७ | पालघर | ९३८८ | ७१२५ | ५६०८ | ७८.७% | १८ |
| १८ | रायगड | २४७१ | २१७७ | १५९८ | ७३.४% | २६ |
| कोकण विभाग | | १४३८१ | ११४३३ | ९१२९ | ७९.८% | ३ |
| १९ | कोल्हापूर | ५० | १३ | १३ | १००.०% | १ |
| २० | सोलापूर | ७९४ | ६२६ | ५५९ | ८९.३% | ६ |
| २१ | सांगली | ८० | ५० | ४२ | ८४.०% | ९ |
| २२ | पुणे | ३०७८ | ३०५२ | २३०० | ७५.४% | २४ |
| २३ | सातारा | १८७ | १६४ | १२१ | ७३.८% | २५ |
| पुणे विभाग | | ४१८९ | ३९०५ | ३०३५ | ७७.७% | ४ |
| २४ | यवतमाळ | ६६९४ | ५५७२ | ४२४५ | ७६.२% | २० |
| २५ | बुलढाणा | १४४८ | ११३६ | ८६० | ७५.७% | २२ |
| २६ | अमरावती | ५२०५ | ४२९७ | ३२५० | ७५.६% | २३ |
| २७ | अकोला | २०५६ | १३३७ | ८८३ | ६६.०% | ३१ |
| २८ | वाशिम | १२११ | ७९१ | ४५४ | ५७.४% | ३३ |
| अमरावती विभाग | | १६६१४ | १३१३३ | ९६९२ | ७३.८% | ५ |
| २९ | वर्धा | ३५०० | २७९९ | २४३० | ८६.८% | ७ |
| ३० | नागपूर | ३१८८ | २५९६ | २१६४ | ८३.४% | १२ |
| ३१ | चंद्रपूर | ७०८४ | ५८११ | ४४२३ | ७६.१% | २१ |
| ३२ | भंडारा | ५११० | ४४७० | ३१३८ | ७०.२% | २९ |
| ३३ | गोंदिया | ३५७६ | २४५२ | १७०४ | ६९.५% | ३० |
| ३४ | गडचिरोली | ८०७६ | ५६८८ | ३५०२ | ६१.६% | ३२ |
| नागपूर विभाग | | ३०५३४ | २३८१६ | १७३६१ | ७२.९% | ६ |
| एकूण | | १२५९१४ | १००१२८ | ७७७५९ | ७७.७% | |

# पारधी आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वर्धा | ५० | ५० | ४६ | ९२.०% | १० |
| २ | चंद्रपूर | ३५ | १९ | १७ | ८९.५% | १२ |
| ३ | नागपूर | ४८ | ४८ | ४० | ८३.३% | १७ |
| नागपूर विभाग | | १३३ | ११७ | १०३ | ८८.०% | १ |
| ४ | हिंगोली | ३५ | ३५ | ३५ | १००% | १ |
| ५ | लातूर | १७ | १३ | १३ | १००% | ३ |
| ६ | नांदेड | ५० | ४२ | ४२ | १००% | ४ |
| ७ | परभणी | ५६ | ५६ | ५६ | १००% | ५ |
| ८ | बीड | ९२ | ८६ | ७६ | ८८.४% | १४ |
| ९ | उस्मानाबाद | २४७ | २४७ | २०० | ८१.०% | १८ |
| १० | औरंगाबाद | ५७ | ५१ | ४० | ७८.४% | २० |
| ११ | जालना | ३८ | ३२ | २३ | ७१.९% | २३ |
| औरंगाबाद विभाग | | ५९२ | ५६२ | ४८५ | ८६.३% | २ |
| १२ | वाशिम | ६४ | ६४ | ६२ | ९६.९% | ६ |
| १३ | बुलढाणा | ३७१ | ३७१ | ३५१ | ९४.६% | ९ |
| १४ | अमरावती | ४५१ | ४४४ | ४०८ | ९१.९% | ११ |
| १५ | अकोला | ३७४ | ३७३ | ३३२ | ८९.०% | १३ |
| १६ | यवतमाळ | ५९४ | ५९३ | ४२८ | ७२.२% | २२ |
| अमरावती विभाग | | १८५४ | १८४५ | १५८१ | ८५.७% | ३ |
| १७ | धुळे | ४३२ | ४३२ | ४१६ | ९६.३% | ७ |
| १८ | अहमदनगर | १९८ | १९८ | १७४ | ८७.९% | १५ |
| १९ | जळगाव | ५७० | ५६२ | ४३७ | ७७.८% | २१ |
| २० | नाशिक | १४३ | १३७ | ९२ | ६७.२% | २५ |
| २१ | नंदुरबार | १० | ० | ० | ०.०% | २९ |
| नाशिक विभाग | | १३५३ | १३२९ | ११९९ | ८४.२% | ४ |
| २२ | कोल्हापूर | ७ | ७ | ७ | १००% | २ |
| २३ | सोलापूर | २३१ | २०२ | १९३ | ९५.५% | ८ |
| २४ | सातारा | २४ | २४ | २१ | ८७.५% | १६ |
| २५ | सांगली | ३८ | २६ | २१ | ८०.८% | १९ |
| २६ | पुणे | १८८ | १७४ | १२० | ६९.०% | २४ |
| पुणे विभाग | | ४८८ | ४३३ | ३६२ | ८३.६% | ५ |
| एकूण | | ४४२० | ४२८६ | ३६५० | ८५.२% | |

# आदिम आवास योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ९८ | १२ | १२ | १००% | १ |
| नाशिक विभाग | | ९८ | १२ | १२ | १००% | १ |
| २ | गडचिरोली | १७७८ | १७१४ | १२८८ | ७५.१% | ३ |
| ३ | चंद्रपूर | ७२३ | ४८९ | २७७ | ५६.६% | ८ |
| ४ | वर्धा | ३९६ | २०७ | ३४ | १६.४% | १० |
| नागपूर विभाग | | २८९७ | २४१० | १५९९ | ६६.३% | २ |
| ५ | सिंधुदुर्ग | ६६ | ४९ | ४८ | ९८.०% | २ |
| ६ | रायगड | १३९४ | १३९४ | १०१७ | ७३.०% | ४ |
| ७ | ठाणे | १५७८ | १५५३ | ९३५ | ६०.२% | ६ |
| ८ | पालघर | ११३१ | ११२८ | ६५० | ५७.६% | ७ |
| ९ | रत्नागिरी | ८ | ८ | १ | १२.५% | १२ |
| कोकण विभाग | | ४१७७ | ४१३२ | २६५१ | ६४.२% | ३ |
| १० | नांदेड | ४१९ | १८१ | ११५ | ६३.५% | ५ |
| औरंगाबाद विभाग | | ४१९ | १८१ | ११५ | ६३.५% | ४ |
| ११ | यवतमाळ | ४७८४ | ३४९३ | १२२८ | ३५.२% | ९ |
| अमरावती विभाग | | ४७८४ | ३४९३ | १२२८ | ३५.२% | ५ |
| १२ | पुणे | ७५ | ५५ | ७ | १२.७% | ११ |
| पुणे विभाग | | ७५ | ५५ | ७ | १२.७% | ६ |
| एकूण | | १२४५० | १०२८३ | ५६१२ | ५४.६% | |

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

## संचित प्रगती अहवाल - ३१ डिसेंबर, २०२२

| अ.क्र. | जिल्हा | उद्दिष्ट | मंजूर | पूर्ण | % | राज्य रँक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गोंदिया | २० | २० | २० | १००% | १ |
| २ | नागपूर | १६ | ३ | ० | ०.०% | १० |
| नागपूर विभाग | | ३६ | २३ | २० | ८७% | १ |
| ३ | लातूर | १० | १० | ७ | ७०.०% | ३ |
| ४ | उस्मानाबाद | ५१८ | ३२० | १९६ | ६१.३% | ४ |
| औरंगाबाद विभाग | | ५२८ | ३३० | २०३ | ६१.५% | २ |
| ५ | यवतमाळ | १४० | १३९ | २० | १४.४% | ५ |
| ६ | अमरावती | ३३७ | २०९ | २३ | ११.०% | ६ |
| अमरावती विभाग | | ४७७ | ३४८ | ४३ | १२.४% | ३ |
| ७ | सोलापूर | ४ | ४ | ३ | ७५.०% | २ |
| ८ | कोल्हापूर | ६५ | ६५ | ७ | १०.८% | ७ |
| ९ | सातारा | १०८ | ९६ | ४ | ४.२% | ८ |
| पुणे विभाग | | १७७ | १६५ | १४ | ८.५% | ४ |
| १० | अहमदनगर | २० | २० | ० | ०.०% | ९ |
| नाशिक विभाग | | २० | २० | ० | ०.०% | ५ |
| ११ | रत्नागिरी | ९५ | ७५ | ० | ०.०% | ११ |
| कोकण विभाग | | ९५ | ७५ | ० | ०.०% | ६ |
| एकूण | | १३३३ | ९६१ | २८० | २९.१% | |

# रमाई आवास योजना व लाभार्थ्याची महत्वाकांक्षा यामुळे पक्क्या घराची निर्मिती

वायगाव(हळद्या) तालुका समुद्रपूर जिल्हा वर्धा येथे श्री. विलास लक्ष्मन वाघमारे राहत असून त्यांचे कुडा मातीचे पडके घर होते. घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची, रोज मोल मजूरी करून परिवाराचे पोट भरायचे असल्याने त्यांना पक्के घर बांधणे शक्य नव्हते. पावसाळ्याच्या दिवसात संपूर्ण घरात पाणी शिरत असल्याने अशा कच्च्या घरात दिवस काढणे खूप कठीण झाले होते. पक्क्या घराचे स्वप्न त्यांचे या आयुष्यात पूर्ण होईल की नाही ही चिंता त्यांना काय बेचैन करायची.



अशातच रमाई आवास योजना सन २०२१-२२ चे समुद्रपूर तालुक्याला उद्दिष्ट प्राप्त झाले. यामध्ये वायगाव (हळद्या) ग्रामपंचायतीला एकुण २० लाभार्थ्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले. त्यानुसार ग्रामपंचायत वायगाव(हळद्या) कडून घरकुलांचे प्रस्ताव तयार करून पंचायत समिती समुद्रपूर कार्यालयात पाठविले. त्यातच एक प्रस्ताव होता तो श्री. विलास लक्ष्मन वाघमारे यांचा, त्यांचे घरकुल मंजूर होवून घरकुलाचा करारनामा झाला. त्यानंतर पंचायत समिती कार्यालयात कागदपत्राची पुर्तता करून पंचायत समिती स्तरावरून श्री. विलास लक्ष्मन वाघमारे यांचे बँक खाती दि. ३१/०५/२०२२ रोजी घरकुलाचा पहिला हप्ता रक्कम रु.१५,०००/- जमा करण्यात आला. त्यातून त्यांनी घरकुलाचे बांधकामास सुरुवात केली.

जोत्या पर्यंतचे बांधकाम पूर्ण झाल्यावर घरकुलाच्या टप्प्यानुसार फोटो काढून ग्रामसेवक यांनी दुसरा हफ्ता मागणी पत्र पंचायत समितीला दिले. त्यानंतर ग्रामीण गृहनिर्माण अभियंता श्री. सागर फिरंगी यांनी



घरकुलाची पाहणी करून पंचायत समिती कार्यालयास अहवाल सादर करताच दुसरा हप्ता रक्कम रू. ४५,०००/- दि. ११/०७/२०२२ रोजी श्री. विलास लक्ष्मन वाघमारे यांचे बँक खाती जमा करण्यात आला. लिंटेल लेव्हल पर्यंत बांधकाम करत असतांना मनरेगा अंतर्गत मजुरीचे मस्टर रोजगार सेवका मार्फत काढण्यात आले.

लिंटेल लेव्हल पर्यंतच्या बांधकामाचे फोटोसह तीसरा हप्ता मागणी पत्र पंचायत समिती कार्यालयास करताच, ग्रामीण गृहनिर्माण अभियंत्यांनी तपसाणी करून पंचायत समितीस्तरावरून तृतीय हप्ता रक्कम रु.४०,०००/- दि. १९/०८/२०२२ रोजी श्री. विलास लक्ष्मन वाघमारे यांच्या बँक खाती जमा झाला. त्यानंतर त्यांनी घरावर स्लॅब टाकून शौचालयासह पक्क्या घरकुलाचे बांधकाम पूर्ण करून घरावर योजनेच्या नावासह नामफलक लावून अंतिम हप्त्याची मागणी करताच रक्कम रु.२०,०००/- दि. ०३/१२/२०२२ बँक खाती जमा झाले.

अशाप्रकारे घरकुल बांधकामासाठी अनुदान रू.१,२०,०००/- व रोजगार हमी योजनेतून रू.१८,०००/- अनुदान मिळाले या अनुदानामुळे मी माझे घरकुल पूर्ण करू शकलो घर पूर्ण झाल्यानंतर सरपंच, ग्रामसेवक तसेच पंचायत समितीचे गटविकास अधिकारी, घरकुल योजनेचे अधिकारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्या प्रयत्नातून मला गॅस, विज, शौचालयव पाणीपुरवठा ह्या सोईसुविधांचा कृतीसंगम घडूनआल्याने माझे जीवनमान उंचावले असून मी आनंदी आहे व याबाबत शासनाचे खुप खुप आभारी असल्याचे श्री. विलास लक्ष्मन वाघमारे यांनी सांगितले.



# प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मुळे पक्क्या घराची निर्मिती

कामठवाडा हे गाव विदर्भात अमरावती विभागांतर्गत यवतमाळ जिल्ह्यातील दारवा तालुक्यामध्ये आहे. जिल्हा मुख्यालय यवतमाळ पासून या गावचे अंतर साधारणतः ४७ कि.मी. असून या गावाच्या जवळ नेर, मानोरा, दिग्रस व कारंजा हे तालुके आहेत. कामठवाडा मध्यम आकाराचे गाव असून एकूण २९९ कुटुंबे राहतात. सन २०११ च्या जनगणनेनुसार कामठवाडा गावाची लोकसंख्या १२३९ असून त्यापैकी ६२५ पुरुष आहेत तर ६१४ महिला आहेत. कामठवाडा गावात महाराष्ट्राच्या तुलनेत साक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. अशा या गावाचे श्री.सुरेश जपान मोकलकर रहिवासी आहेत. यापूर्वी त्यांचे घर मातीचे आणि पत्र्याचे असल्याने पावसाळ्यात पावसाचा तर उन्हाळ्यात उन्हाचा त्रास सहन करावा लागत होता. त्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना मनात आपलेही पक्के घर असावे अशी कित्येक वर्षापासूनची इच्छा होती. परंतु आर्थिक अडचणीमुळे त्यांचे स्वप्न पूर्णत्वास नेण्यास त्यांना अडचणी येत होत्या.

अशातच श्री. सुरेश जपान मोकलकर यांना त्यांच्या ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलाची माहिती दिली. तसेच त्यांना सगळ्या अटी, शर्ती व आवश्यक कागदपत्रा बाबत सविस्तर समजावून सांगितले. त्यानुसार श्री. सुरेश जपान मोकलकर यांचेकडून आवश्यक कागदपत्राची पूर्तता करून घेऊन ग्रामसभेच्या ठरावासह प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलाचा प्रस्ताव मंजुरीसाठी वरीष्ठ कार्यालयाकडे सादर करण्यात आला. श्री.सुरेश जपान मोकलकर यांच्या प्रस्तावाला मंजूरी देवून त्यांना प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुल मंजूर करण्यात आले. त्यामुळे त्यांना पक्क्या घराचे स्वप्न पूर्ण होण्याचे संकेत दिसू लागले.

श्री.सुरेश जपान मोकलकर यांचे घरकुल मंजूर झाल्यावर दारवा पंचायत समिती कार्यालयाने त्यांच्याकडून आधार कार्ड, नमुना ८, बँक पासबुक, जॉब कार्ड इत्यादी कागदपत्राची पूर्तता करण्याचे सांगितले. त्यानुसार श्री.सुरेश जपान मोकलकर यांनी कागदपत्र पंचायत समितीकडे सादर करताच दारवा पंचायत समितीचे गट विकास अधिकारी श्री. शिंदे यांनी घरकुलाचा पहिला हप्ता श्री.सुरेश जपान मोकलकर यांच्या बँक खाती जमा केला. घरकुलाचा पहिला हप्ता जमा होताच श्री. सुरेश जपान मोकलकर यांनी घरकुल बांधकामास सुरुवात केली.

श्री. सुरेश जपान मोकलकर यांना घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार घरकुल बांधकामासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून रक्कम रु.१,२०,०००/- अर्थसहाय्य मिळाले. त्या सोबतच शासनाच्या विविध योजनांच्या कृती संगमातून श्री. सुरेश जपान मोकलकर यांना घरकुलासह स्वच्छ भारत मिशन(ग्रा) मधून शौचालयासाठी रू. १२,०००/-, मनरेगा मधून रू. १८,०००/- रुपये असे एकूण रक्कम रू.१,५०,०००/- अर्थसहाय्य मिळाले. त्यामुळे त्यांनी पाहिलेले पक्क्या घराचे स्वप्न शौचालयासह पूर्ण झाले.

आता मला पुन्हा पावसाची भिती नाही आणि उन्हाच्या झळापासून सुटका झाली असल्याचे श्री. सुरेश जपान मोकलकर यांनी सांगितले. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण मधून मिळालेल्या घरकुलामुळे त्यांचा परिवार अत्यंत आनंदी झालेला आहे. याकरीता त्यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, तालुका डेटा एन्ट्री ऑपरेटर, गट विकास अधिकारी तसेच ज्यांनी प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सहकार्य केले सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व शासनाचे आभार व्यक्त केले आहे.





# महा आवास अभियानामुळे पक्क्या घराची स्वप्नपूर्ती

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यामधील ग्रामपंचायत उमरखेड येथील श्री. रामेश्वर साहेबराव फुके यांना महा आवास अभियान २.० अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण मधून सन २०२१-२२ मध्ये घरकुल मिळाले. असून याकरीता त्यांना घरकुलासाठी शासनाचे रक्कम रू. १,२०,०००/- व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रू. २२,२३०/- इतके अर्थसहाय्य तर मिळालेच त्यासोबतच स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण मधून शौचालय, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी व उज्वला योजने मधून गॅस जोडणी, इ. शासकीय योजनांचा लाभ शासकीय योजनांच्या कृती संगमातून मिळाला.

"सर्वांसाठी घरे २०२४" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्वीकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना व त्यांना पुरक पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना राबविण्यात येतात. या योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता वाढीसाठी दिनांक २० नोव्हेंबर, २०२१ ते दिनांक ३० जून, २०२२ या कालावधीत राज्यात महा आवास अभियान २.० राबविण्यात आले. या अभियान कालावधीत लाखो गरिब, गरजू, बेघर व भूमिहीनांचे घरकुलाचे स्वप्न पूर्ण झाले, त्यापैकीच एक श्री. रामेश्वर साहेबराव फुके.

श्री. रामेश्वर साहेबराव फुके आधी पत्राच्या कच्च्या घरात त्यांच्या कुटुंबासह राहात होते. त्यांचे घर पावसाळ्या मध्ये गळायाचे, ऊन्हाळ्यात तापायचे तर हिवाळ्यामध्ये थंड पडायचे, यामुळे रात्रीची गाड झोप नशीबात नव्हती. त्यामध्ये घराला सुरक्षित भिंत नसल्याने विंचू काट्याची भीती कायम मनात राहायची. अशातच त्यांना प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण मधून घरकुल मंजूर झाले. याबाबत त्यांना माहित नव्हते, परंतु ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांनी श्री. रामेश्वर साहेबराव फुके यांचेशी संपर्क साधून सविस्तर माहिती दिली व त्यांना कागदपत्रांची पूर्तता करण्यास सांगितले.



श्री. रामेश्वर साहेबराव फुके यांनी कागदपत्राची पुर्तता करताच त्यांच्या खात्यावर काम सुरु करण्यासाठी पहिला हप्ता रक्कम रू. १५,०००/- इतके अर्थसहाय्य जमा करण्यात आले. मिळालेले अर्थसहाय्य व घर बांधकाम आपल्याला चालू करायचे आहे म्हणून नातेवाईकाकांडून उसनवार घेतलेली रक्कम याव्दारे त्यांनी बांधकामास सुरूवात केली. बघता बघता श्री. रामेश्वर साहेबराव फुके यांनी घरकुलाचे बांधकाम पूर्ण केले. या कामी त्यांना घरकुलाचे सर्व हप्ते बांधकामाच्या टप्प्यानुसार वेळेत मिळाल्याने मी घरकुल बांधकाम पूर्ण करू शकलो, हे फक्त महा आवास अभियानामुळे शक्य झाल्याची प्रतिक्रीया श्री. रामेश्वर साहेबराव फुके यांनी व्यक्त केली.

त्यांच्या सुंदर व आदर्श घरकुलाच्या निर्मितीसाठी श्री. रामेश्वर साहेबराव फुके यांना घरकुल बांधकाम करतांना ग्रामसेवक, सरपंच, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, पंचायत समिती स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, नातेवाईक व ग्रामस्थ यांनी सर्वोत्तोपरी सहकारी केले. त्याबद्दल श्री. रामेश्वर साहेबराव फुके यांनी सर्वांचे विशेष आभार मानले आहे.



# जळगाव जिल्हात उमेद घरकुल मार्टची यशस्वी वाटचाल

ग्रामीण भागातील पात्र,गरजु, गरिब कुटुंबांना स्वतःचे घरकुलासह महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणे व ग्रामीण कुटुंबांची शास्वत उपजीविका विकसित व्हावी यासाठी जिल्हा ग्रामीण जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा जळगाव विविध उपक्रम राबवित आहे. यामध्ये ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांना स्वस्त दरात गावातच घराचे बांधकाम साहित्य उपलब्ध व्हावे व हे साहित्य विक्री मधून दोन पैसे उत्पादन नफा हा ग्रामीण भागातील कुटुंबांनाच मिळावा या उद्देशाने राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने घरकुल मार्ट ही संकल्पना महा आवास अभियान २.० मध्ये राबविली. जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्या मधील शिरसोदे या गावात रमाई महिला ग्राम संघ व माऊली स्वयं सहा समूहा यांच्या पुढाकाराने शिरसोदे येथे उमेद घरकुल मार्ट सुरू केले.



उमेद घरकुल मार्ट उभारण्यासाठी माऊली स्वयंसहायता समूहास क्रांती ज्योत प्रभाग संघ आणि रमाई ग्राम संघ सिरसोदे यांना उमेद अभियांनातून मापक व्याजदरावर रक्कम रू. १,००,०००/- भांडवल उपलब्ध करून दिले. त्यासोबतच माऊली समूहातील महिलांनी स्वतः जवळची रक्कम रू. ५०,०००/-असे एकुण रक्कम रू.१,५०,०००/- प्रथम टप्प्यात भांडवल गुंतवण घरकुल मार्ट सुरु केले. या घरकुल मार्टच्या माध्यमातून शिरसोदे, बहादरपूर, महाळपूर आणि जवळपासच्या गावांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी लागणारे आवश्यक ते साहित्य तसेच प्लंबिंग साहित्य हे गावातच योग्य दरात उपलब्ध करून देत सेवा देणे सुरू केले. या उपक्रमास सर्व स्तरावरून उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असून गेली दोन वर्षापासून या घरकुल मार्टची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

माऊली स्वयंसहायता समूहास क्रांती ज्योत प्रभाग संघ आणि रमाई ग्राम संघ सिरसोदे यांनी सुरू केलेल्या या उमेद घरकुल मार्चच्या माध्यमातून दरमहा रू.२,००,०००/- पर्यंत साहित्य विक्री होत असून यामुळे या महिला संघाला दरमहा किमान रक्कम रू. १२,०००/- ते रू.१५,०००/- निव्वळ नफा होत आहे. या महिला संघाने एवढ्यावरच न थांबता पुढील टप्यात या समूहातील महिलांनी उपलब्ध नफ्यामधून या घरकुल मार्ट मध्ये आणखी भांडवली गुंतवणूक वाढवून आजच्या तारखेत जवळपास रक्कम रू. ४,००,०००/- पेक्षा जास्त भांडवल गुंतवणूक विविध प्रकारच्या साहित्याची विक्री करून आपला व्यवसाय निरंतर सुरू ठेवण्यात यश आले आहे.

उमेद घरकुल मार्ट घरकुल लाभार्थ्यांसह इतर बांधकाम करणाऱ्या ग्रामीण भागातील लोकांनाही आवश्यक ते साहित्य योग्य दरात उपलब्ध करून देण्यासाठी निरंतर प्रयत्न करत आहेत. या यशस्वी वाटचालीमध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व उमेद अभियानाची मोलाची भूमिका असून पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, घरकुल लाभार्थी व लोकांचे विशेष सहकार्य मिळत आहे. अशा पद्धतीने मौजे शिरसोदे तालुका पारोळा जिल्हा जळगाव येथे माऊली समूहाच्या पुढाकाराने **उमेद घरकुल मार्ट** ची यशस्वी वाटचाल मागील दोन वर्षापासून सुरू असून पुढील व्यवसाय वाढीसाठी ते प्रयत्नशील आहेत.

महा आवास अभियान २.० मध्ये शासनाने राबविलेला घरकुल मार्ट हा उपक्रम ग्राम महिला संघाला व्यवसायीक व स्वावलंबी बनविण्याच्या दृष्टीने अत्यंत महात्वाचा उपक्रम आहे. या उपक्रमामुळे आज आमच्या सारख्या कित्येक ग्रामीण भागातील महिलांना रोजगार उपलब्ध झाला असून आम्हाला उपजिविकेचे साधन मिळाले असल्याची प्रतिक्रीया या स्वयंसहायता / ग्राम संघाच्या महिलांनी व्यक्त केली.





# ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांसाठी सोलापूर जिल्ह्यात विशेष उपक्रम

**सो**लापूर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे मार्फत जिल्ह्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना अशा विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना व त्यांना पुरक पंडित दिनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, अतिक्रमण नियमानुकूल करण्याची योजना राबविण्यात येतात. यासर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांसाठी जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिलीप स्वामी यांचे संकल्पनेतून व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.संतोष धोत्रे यांचे मार्गदर्शनाखाली विशेष उपक्रम राबविण्यात आले. यामुळे सोलापूर जिल्ह्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामात गतिमानता व गुणवत्ता आली आहे.



राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना सन २०२१-२२ अंतर्गत सोलापूर जिल्हयाकरीता ३०९२ इतके उद्दिष्ट प्राप्त झाले असून दि.१८/०४/२०२२ रोजी एकाच दिवशी एकुण २६४१ घरकुलांना मंजुरी देण्यात आली. या मंजूर घरकुलांपैकी १७०० लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर एकाच दिवशी पहिला हत्याची रक्कम रू. १५०००/- प्रति लाभार्थी जमा करण्यात आली. उर्वरीत ९४१ लाभार्थ्यांचे Account Verification झाल्यानंतर दि. ३०/०४/२०२२ रोजी त्यांचा बँक खाती पहिला हप्त्याची रक्कम जमा करण्यात आली.



लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करतांना मार्गदर्शनासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत सोलापूर जिल्हयात १० तालुक्यात पंचायत समिती आवारात डेमो हाऊस बांधण्यात आले आहे. जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थितीनुसार, स्थानिक बांधकाम साहित्याचा वापर करून घरकुलाची निर्मिती कशी करावी, यासाठी सोलापूर जिल्ह्यात जिल्हास्तरावर डेमो हाऊस बांधण्यात आले आहे. या जिल्हास्तरीय डेमो हाऊसचे लोकार्पण सोलापूर जिल्ह्याचे मा.पालकमंत्री यांचे शुभहस्ते केले.

जिल्हास्तरी डेमो हाऊसचे बांधकाम करतांना यामध्ये फ्रेमड स्ट्रक्चर वापरले. हे डेमो हाऊस पर्यावरण पूरक असून या लाकडाचा वापर न करता लोखंडी खिडक्या व लोखंडी दरवाज्यांचा वापर करण्यात आला आहे. या डेमो हाऊस मधील शौचालयास सेफ्टीक टँक ऐवजी शौष खड्डा करण्यात आला, जेणे करून या शौष खड्ड्यात तयार होणारे खत वापता येईल व परिसर स्वच्छ राहील. पारंपारीक मातीच्या विटा ऐवजी फ्लाय ॲश ब्रिक्स चा वापर करण्यात आला आहे. वाळूला पर्याय म्हणून डेमो हाऊस बांधकाम करतांना क्रश सॅण्डचा वापर करण्यात आलेला आहे. डेमो हाऊसचा परीसर सुशोभित करून वृक्षारोपन करण्यात आले आहे. डेमो हाऊसला सुबक रंगरंगोटी करण्यात आली असून हे डेमो हाऊस संपूर्म जिल्ह्यासाठी आदर्श ठरले आहे.

सोलापूर जिल्हा ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करत असून भविष्यात जिल्ह्यामध्ये एकही बेघर राहणार याकरीता आम्ही प्रयत्नशिल असल्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दिलीप स्वामी यांनी सांगितले. तर सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून बेघर, गरजू व भूमिहीन लाभार्थ्यांना प्राधान्याने घरकुलाचा लाभ देणार. तसेच घरकुलासह शासनाच्या विविध योजनांशी कृती संगम करून इतरही शासकीय योजनांचा लाभ घरकुल लाभार्थ्यांना देणार अशी प्रतिक्रीया जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्री.संतोष धोत्रे यांनी दिली.



# स्थानिक बांधकाम साहित्य वापरून दर्जेदार घरकुलाची निर्मिती

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यामध्ये मिठमुंबरी गावामध्ये श्रीमती सखुबाई देवू गावकर यांना प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण मधून सन २०२१-२२ या वर्षात घरकुल मंजूर झाले असून त्यांना घरकुल बांधकामासाठी रक्कम रू. १,२०,०००/- व नरेगा मधून रक्कम रू. २२,२३०/- इतके अर्थसहाय्य मिळाले आहे.

श्रीमती सखुबाई देवू गावकर यांनी दि.०४/०५/२०२२ रोजी घरकुल मंजूर झाले. त्यानंतर त्यांच्या बँक खाती पहिल्या हप्त्याची रक्कम जमा झाल्यावर त्यांनी लगेचच घरकुल बांधकामास सुरुवात केली. त्यांनी घरकुल बांधकामात स्थानिक बांधकाम साहित्याचा वापर करून स्वतः जवळची काही रक्कम टाकून अत्यंत सुंदर व दर्जेदार घराची निर्मिती केली. या कामी पंचायत समिती कार्यालयाकडून श्रीमती सखुबाई देवू गावकर यांना घरकुल बांधकामाच्या टप्प्यानुसार निधीचे वितरण विनाविलंब केले. त्यामुळे त्यांचे घरकुल बांधकाम अत्यंत कमी कालावधीत पूर्ण झाले.



केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण व राज्य पुरस्कृत सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांना गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात महा आवास अभियान २.० राबविण्यात आले. श्रीमती सखुबाई देवू गावकर यांचे घरकुल या अभियान कालावधीत असल्याने त्यांच्या घरकुल मंजूरी पासून ते घरकुल बांधकामापर्यंत सर्व प्रक्रीया अत्यंत गतिने पूर्ण करण्यात आल्या. या महा आवास अभियानामुळे श्रीमती सखुबाई देवू गावकर यांना घरकुलास इत्तर शासकिय योजनांच्या कृती संगमातून लाभ देण्यात आला. यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने मधून रोजगार,स्वच्छ भारत मिशनग्रामीण मधून शौचालय, सौभाग्य योजने मधून विद्युत जोडणी, इ. सर्व योजनांचा लाभार्थ्यास प्रत्यक्ष लाभ देणेत आला असून तालुक्यातील आदर्श घरकुल बांधकाम करण्याचा मानही त्यांना मिळाला आहे. श्रीमती सखुबाई देवू गावकर यांनी त्यांच्या घरकुलाला सुंदर रंगरंगोटी केली असून स्वयंपाक घरात टाईल्सचा वापर, किचन वटा, इलेक्ट्रीफीकेशन, प्लबिंग व पाश्चिमात शौचालय बांधले आहे.



श्रीमती सखुबाई देवू गावकर यांचे घरकुल बांधकाम करतांना पंचायत समितीस्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांनी घरकुलांना भेटी देवून मार्गदर्शन केले. तसेच ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी घरकुल ले-आऊट ते घराला रंगरंगोटी पर्यंत बांधकामाच्या प्रत्येक टप्याची तपासणी व तांत्रिक मार्गदर्शन केले.

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत मला घरकुलाचा लाभ मिळाला यासाठी मी शासनाचे आभारी आहे. या आधी माझे कच्या स्वरुपाचे मातीचे घरकुल होते. शासनाने राबविलेल्या महा आवास अभियानामुळे माझे पक्क्या हक्काच्या दर्जेदार घराचे स्वप्न पुर्ण झाले आहे. यासाठी ग्रामपंचायत स्तरावरुन ग्रामसेवक,सरपंच,उपसरपंच,तसेच तालुका स्तरावरील सर्व अधिकारी वर्गाचे मार्गदर्शन तसेच बहुमुल्य मदत झाल्यामुळे सर्वांचे आभार व कृतज्ञता व्यक्त करीत आहे.





# महा आवास अभियान २०२०-२१ राज्यस्तरीय पुरस्कार वितरण

फोटो गॅलरी



# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : अमृत महाआवास अभियानाचा आरंभ

# राज्यात पाच लाख घरकुलांचे उद्दिष्ट

सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. २४ : सन २०२४ पर्यंत 'सर्वांसाठी घरे' हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे उद्दिष्ट असून त्यासाठी 'अमृत महाआवास योजना' २०२२-२३ अभियानातील ५ लाख घरे पुढील १०० दिवसांत बांधण्यात येणार आहेत. विक्रमी वेळेत घरकुले बांधली जाणार असून पंतप्रधान मोदी यांच्या उपस्थितीत सर्वसामान्यांचा गृहप्रवेश होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज दिली.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित 'अमृत महाआवास अभियान २०२२-२३' या राज्यस्तरीय शुभारंभ व पुरस्कार वितरण मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष ॲड राहुल नार्वेकर, ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन आदी यावेळी उपस्थित होते.

सर्वांना घरे मिळावी यासाठी राज्यात विविध योजना राबविल्या जात आहेत. यासाठी सर्वसामान्य लोकांना समोर ठेवून लोकहिताचे निर्णय घेण्यात येत आहेत. राज्याच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही. त्यामुळे ग्रामीण विकास यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी दर्जेदार आणि वेळेत घरे देण्यासाठी प्रयत्नशील राहावे. केंद्र आणि राज्य सरकार एकमेकांच्या हातात हात घालून काम करतात, तेव्हा राज्याचा विकास वेगाने होत असल्याचे मत मुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केले. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून सामान्य माणसांचा विकास होत आहे. योजनांचा लाभ तळागाळातील लोकांपर्यंत प्राप्त होत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी विधानसभा अध्यक्ष ॲड. नार्वेकर यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील लोकसंख्या अधिक आहे. त्यामुळे ग्रामीण भागात अधिक पायाभूत सुविधा देऊन तेथील लोकांचे जीवनमान उंचविण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे, असे महाजन म्हणाले. मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री फडणवीस, ॲड नार्वेकर यांच्या हस्ते 'अमृत महाआवास पुरस्कार-२०२३' या पुस्तिकेचे प्रकाशन झाले.

**'महाराष्ट्र बेघरमुक्त करणार'**

पंतप्रधान आवास योजना ग्रामीण यामध्ये ग्रामीण विकास यंत्रणेने अतिशय चांगले काम केले आहे. अमृत महाआवास योजनेत मार्च २०२३ पर्यंत ५ लाख घरकुले बांधण्यात येतील. बेघर आणि गरजू लोकांच्या व्यतिरिक्त जे नागरिक महाआवास योजनेच्या निकषात बसत नाहीत, अशा नागरिकांना निकषात बसण्यासाठी नवीन योजना तयार करून 'बेघरमुक्त महाराष्ट्र' करण्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

# अमृत महाआवास अभियानाचा आज शुभारंभ

मुंबई : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्रात २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या राष्ट्रीय आवास दिनापासून ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत 'अमृत महाआवास अभियान २०२२-२३' राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ व महाआवास अभियान पुरस्काराचे वितरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत २४ नोव्हेंबर २०२२ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर ऑडिटोरिअम येथे होणार आहे. राज्यात राबवण्यात येणाऱ्या 'अमृत महाआवास अभियान २०२२-२३' या अभियानामुळे ५ लाख गरीब, गरजू, बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ण होणार असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.

'सर्वांसाठी घरे-२०२४' या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची गतीने प्रभावी अंमलबजावणी करणे व कामात गुणवत्ता आणणे, हा या अभियानाचा हेतु आहे, असे महाजन म्हणाले.

**उपक्रम**

१) भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे, २) घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे शंभर टक्के मंजु री देणे, ३) मंजूर घरकुलांना सर्व हप्ते वेळेत वितरीत करणे, ४) सर्व मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे, ५) प्रलंबित घरकुले पूर्ण करणे, ६) ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे, ७) इंदिरा आवास योजनेंतर्गत उर्वरित सर्व घरकुले पूर्ण करणे व क्षेत्र अधिकारी ॲप वापरणे, ८) सामाजिक लेखापरीक्षण वेळेत करणे, ९) शासकीय योजनांशी कृतीसंगम करणे आणि १०) नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे.

## राज्यात पाच लाख घरकुले पूर्ण करण्याचे उद्दिष्ट

बेघरमुक्त महाराष्ट्र करणार - उपमुख्यमंत्री

## ५ लाख घरे बांधणार

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषणा

## राज्य पुरस्कृत आवास योजनेत वर्धा जिल्ह्याला राज्यात तिसरा पुरस्कार

देशोन्नती वृत्तसंकलन...

गृह संकुल उभारणीत वाठोड्याला राज्यात प्रथम पारितोषिक

## प्रधानमंत्री ग्रामीण पुरस्कृत आवास योजनेत नांदेड जिल्हा परिषदेला तीन पुरस्कार

नांदेड- घरकुलाच्या उद्दिष्टाप्रमाणे शंभर टक्के मंजुरी देणे या राज्य पुरस्कृत आवास योजनेत राज्यात नांदेड जिल्ह्याला द्वितीय क्रमांक, लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी वित्तीय संस्थांचे कर्ज मिळवून देण्यासाठीचा दुसरा तर मूलभूत नागरी सुविधा देऊन आदर्श घरांची निर्मिती करण्यासाठी राज्यातला तिसरा पुरस्कार मिळाला आहे. मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात नांदेड जिल्हा परिषदेचा पुरस्कार देवून गौरव करण्यात आला.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, ग्रामविकास मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांची उपस्थिती होती. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले यांना उपस्थितांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण आणि इतर राज्य पुरस्कृत आवास योजनेत जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अधिकारी कर्मचारी गट विकास अधिकारी ग्रामसेवक यांनी पुढाकार घेऊन ही काम केलेली आहेत. त्यामुळे हा पुरस्कार मिळाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

नांदेड जिल्ह्याला आवास योजनेत तीन पुरस्कार मिळाले. त्याबद्दल आनंद झाला. पुढील कामे करण्यासाठी हे पुरस्कार प्रेरणादायी आहेत. जास्तीत जास्त लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे घर देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहणार आहोत.

–मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा ठाकूर

## बेघरांच्या स्वप्नातील अमृत महाआवास योजना यशस्वी करा : ना. गुलाबराव पाटील

## घरकुलच्या कामांना गती देण्याचे नियोजन करा

पालकमंत्री संजय राठोड : महाआवास अभियान तीनचा जि. प.मध्ये शुभारंभ

## महिला बचत गटाचा एलईडी बल्ब व्यवसाय प्रेरणादायी : राजेश कुमार

## राज्य संचालकांनी केली 'डेमो हाऊस'ची पाहणी

ग्रामपंचायतींना भेट देत साधला संवाद

## महाराष्ट्र की टीम ने की आवास योजना की जांच

## महाराष्ट्र के अधिकारियों ने विकास कार्यों का लिया जायजा

## अमृत महाआवास अभियानाचा आढावा

घरकुल विभागाची आढावा बैठक

## पंचायत समितीच्या वतीने डॉ. राजाराम दिघे यांचे स्वागत

देशोन्नती वृत्तसंकलन...

## महाआवास अभियान पुरस्कार वितरण सोहळा

## महा आवास अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्याला १३ पुरस्कार

## पुरस्कार म्हणजे भविष्याच्या यशस्वी वाटचालीची प्रेरणा - आ. वडेट्टीवार

## येवला तालुक्यात घरकुलांचे ६,५०० हून अधिक उद्दिष्ट

अमृत महाआवास अभियान कार्यशाळा : कामे तातडीने पूर्ण करण्याच्या बैठकीत सूचना

## महाराष्ट्र के अधिकारियों ने पीएम आवास योजना का किया अध्ययन

## महाराष्ट्र के अफसरों ने बैतूल जिले के पीएम आवास निर्माण को सराहा

## धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर गव्हाळी येथील २५ लाभार्थींना मिळाली हक्काची घरकुले

## दोनशे लाभार्थ्यांच्या खात्यावर पहिला हप्ता जमा

## ग्रामीण भागात विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करा - वर्षा ठाकूर

## घरकुल योजनेत उत्कृष्ट कामाबद्दल ग्रामसेवक सातपुते यांचा सन्मान

## घरकुलाचे काम शंभर दिवसांत पूर्ण करा

विभागीय आयुक्त विजयालक्ष्मी बिदरी यांचे निर्देश

## १० हजार घरकुलांचे एकाच दिवशी होणार मार्कआऊट

Fresh Stock FLAT 50% OFF Raymond DIGJAM SUITING | SHIRTING | READYMADE

## जिल्हाधिकारी, झेडपी सीईओंचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सन्मान होणार

## अमृत महाआवास अभियानाची तालुकास्तरीय कार्यशाळा

## प्रधानमंत्री घरकूल योजनेचे भूमिपूजन

## नव दुर्गा

रश्मी सांडेकर

## बेघरांना हक्काचा निवारा देण्याचा मानस

## गटविकास अधिकाऱ्यांची गृहभेटी थंडीच्या हुडहुडीत लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य उमटल

## घरकुलाचा पहिला हप्ता जमा

अद्याप बांधकाम न करणाऱ्या ४०८ लाभार्थ्यांना न्यायालयाची नोटीस

## नव्या वर्षात होणार आठ हजार कुटुंबांच्या स्वप्नपूर्तीला सुरुवात

हक्काचे घरकुल : गुरुवारी जिल्हाभरात ...

## एक दिवस घरकुलांसाठी

## चंद्रपूर जिल्ह्यातील २० सरपंचांनी पाहिले धानोली गावाचे सौंदर्य

# बहुमजली घरकुलाचा राज्यभरात डंका

सोमेश्वरनगर, ता. २६ : एक गुंठ्यात एकच घरकुल असेच आतापर्यंतचे गृहितक होते. परंतु एक गुंठ्यात दोन-तीन घरकुले मजल्यावर मजले चढवून बांधता येतात हे करंजेपूल (ता. बारामती) ग्रामपंचायतीने सिध्द केले आहे. बहुमजली घरकुलाच्या अनोख्या प्रयोगासाठी राज्यसरकारच्या ग्रामविकास विभागाने करंजेपूल ग्रामपंचायतीस 'सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत' असा प्रथम क्रमांकाचा राज्यस्तरीय पुरस्कार मुख्यमंत्र्यांच्या देऊन नुकतेच गौरविले आहे.

जागेअभावी घरकुले परत जातात किंवा जागा असते पण खरेदीदर परवडणारा नसतो. त्यामुळे लाखो लोक बेघर आहेत. करंजेपूल गावाने यावर उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला आहे. गावातील सुरेश व अनुसया गायकवाड या दांपत्याने स्वतःच्या मालकीच्या एका गुंठ्यात कॉलम टाकून रहायला छोटी खोली बांधली आणि पुढच्या गाळ्यात किराणा दुकान सुरू केले. त्यांची तीन मुले चहाचे हॉटेल चालवतात. लग्नानंतर मुलांच्या राहण्यासाठी घरकुलांची गरज भासू लागली.

सुरेश यांना एक आणि मोठा मुलगा संभाजी यांना एक घरकुल मंजूर झाले. पण जागाच नसल्याने घरकुल परत जाण्याची वेळ आली. यावर सरपंच वैभव गायकवाड व तत्कालीन ग्रामसेवक आबासाहेब यादव यांनी राज्यातील पहिला प्रयोग करायचे ठरविले. किराणा दुकानाच्या मजल्यावर दुसरा आणि तिसरा मजला घरकुल योजनेतून बांधायचा निर्णय घेतला. सुरेश गायकवाड यांच्या नावावरील गुंठ्यात संभाजीला घर बांधण्यास प्रतिज्ञापत्राव्दारे संमती दिली. एकाच कुटुंबातील असल्याने प्रस्ताव बनविणे शक्य झाले.

# लोकअदालत : घरकुल लाभार्थी हाजीर हो....

## अचलपूरमध्ये ४०८ लाभार्थींना नोटीस

लोकमत न्यूज नेटवर्क

परतवाडा/तिवसा : घरकुलाचे अपूर्ण बांधकाम करणाऱ्या व घरकूल मंजूर होऊनही बांधकाम सुरू न करणाऱ्या लाभार्थीसह थकित मालमत्ता कर व पाणीपट्टीचा भरणा न करणाऱ्या नागरिकांना शासनाने नोटीस बजावली आहे. त्यांना १२ नोव्हेंबर रोजी तिवसा येथे आयोजित होणाऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडावे लागेल; अन्यथा संबंधित मालमत्तेवर बोजा चढविण्यात येणार असून, लाभार्थींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे बजावण्यात आले आहे.

अचलपूर पंचायत समिती अंतर्गत ज्या घरकुल लाभार्थींनी प्रथम हप्ता घेतला, परंतु अद्यापही घराचे बांधकाम सुरू केले नाही अशा ४०८ लाभार्थींना अचलपूर न्यायालयाकडून नोटीस बजावण्यात आल्या आहेत, असे अचलपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुधीर अरबट यांनी स्पष्ट सांगितले.

तालुका विधी सेवा प्राधिकरण अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश-१ अचलपूर एम.एच. पठाण यांच्या अध्यक्षतेखालील शिबिराला माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलाताई गवई या विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अचलपूर वकील संघाचे अध्यक्ष ॲड. नितीन चौधरी, उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार, भारतीय स्टेट बँकेचे शाखा प्रबंधक नवीनकुमार डोनीवाल मार्गदर्शन करणार आहे.

पंचायत समिती व ग्रामपंचायत प्रशासनाकडून वेळोवेळी सूचना करूनही तिवसा तालुक्यातील २५९ लाभार्थींनी घरकूल अनुदानाचा पहिला हप्ता मिळाल्यानंतर विहित मुदतीत घरकुलाचे बांधकाम सुरु केले नाही. १ हजार ४३१ लाभार्थींनी अद्याप घरकुलांचे काम सुरु केलेले नाही. त्यामुळे तालुक्यातील अपूर्ण व बांधकाम सुरु न केलेल्या घरकुलांची संख्या वाढत आहे. अशांमुळे तालुक्याला घरकुलांचे लक्ष्यांक कमी देण्यात येते. याचा फटका अन्य बेघरांना बसतो.

- डॉ. चेतन जाधव, गटविकास अधिकारी, तिवसा.

## गोरगरीब, गरजूंना स्वप्नातील घर देणारी ग्रामीण विकास यंत्रणा

## घरकुलच्या ४०८ लाभार्थ्यांना न्यायालयाची नोटीस

पहिला हप्ता मिळूनही बांधकाम न करणे भोवले

## अधिकारी लाभार्थ्यांच्या भेटीला

## घरकुलाची चावी देऊन लाभार्थ्यांचा सन्मान

अमृत महाआवास अभियान

## घरकुलाचे बांधकाम न केल्यास शासन पैसे परत घेणार

तालुक्यात ५१९ लाभार्थ्यांना नोटीस, लोकअदालतमध्ये हजर राहण्याचे निर्देश




अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी मा.अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार यांचे स्वागत करतांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे




अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी प्रास्ताविक सादर करतांना मा. अतिरिक्त मुख्य सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.राजेश कुमार




अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी अभियानाचे सादरीकरण करतांना संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण डॉ. राजाराम दिघे




अमृत महा आवास अभियान राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा व पुरस्कार वितरण समारंभ प्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवर

## “महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
## २०२४ पर्यंत सर्वांसाठी आवास”





## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
दुरध्वनी क्र. - ०२२ - २७५६१८२४, महा आवास हेल्पलाईन क्रमांक - १८०० २२ ०१९
ई-मेल - directoriayruralhousing@gmail.com, वेबसाईट - www.mahaawaas.com